# सींचेतकल्प

## ई-दिवाळी-अंक २०२३



गोखले एज्युकेशन सोसायटीचे

## सर डॉ. मो. स. गोसावी पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट

नाशिकरोड, नाशिक - ४२२ १०१



# <u>गणेश वंदना</u>



नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।
वरद **विनायक** तुमची महती । ईच्छापूर्ती तव कृपेनी ।
मंगलमुर्ती गणाधीपती । महड निवासी जग उद्धारी ।
**विद्या** बुद्धी भक्तां वरसी शरण तुम्हांसी महागणपती ।

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका

तुम्ही कृपेची सदा सावली । स्मरण करता कार्य **सिध्दी** ।
दर्शन घेता दु:ख हरती । पाप सरती मोक्ष प्राप्ती ।
नामस्मरणे आत्मशक्ती । भक्ति रसाची नवी अनुभूती ।

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।

यत्रा करता मन आनंदी । **विघ्ने** टळती भय पळती ।
सगुण स्वरुप प्रसन्न मुर्ती । ह्रदयी सदैव कोरुन नेती ।
भव सागरी या तरुन नेसी आत्मसुखाची येई भरती



नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।
कला संस्कृती तुमच्या दासी । सर्व **सिध्दी** आम्हां लभती ।
तुम्हां समर्पीत कलाकृती । कला सेवेची अनुमती द्यावी. ।

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।

- मंगेश मेधी





**Namdar Gopal Krishna Gokhale**
After whom our Society is named



**Prin. T. A. Kulkarni**
Foundr of Gokhale Education Society

## This E-Diwali Magazine 2023 'SANCHITKALP' specially dedicated to



**Late Sir Dr. M. S. Gosavi**
Former Secretary and Director General: G. E. Society



**Late Dr. Mrs. S. M. Gosavi**
Former Principal of SMRK, AK, BK, Mahila Mahavidyalaya G. E. Society



**Prin. S. B. Pandit**
President: G. E. Society



**Prin. Dr. Mrs. D. P. Deshpande**
Secretary, Director (HR) and Treasurer
G. E. Society, Nashik



**Prin. Dr. R. M. Kulkarni**
Zonal Secretary
G. E. Society, Nashik



**Dr. R. P. Deshpande**
Branch Secretary
G. E. Society, Nashik



**Mr. P. M. Deshpande**
Director (Project)
G. E. Society, Nashik



**Mr. S. M. Gosavi**
Director (Establishment)
G. E. Society, Nashik



## A LEAD & QUALITY EDUCATIONAL ENTERPRISE

- **ESTABLISHED IN 1918. NINETY FIVE YEARS OF QUALITY SERVICE.**
- **THREE ZONES – NASHIK, MUMBAI & THANE WITH 17 CENTRES AND 121 INSTITUTIONS.**
- **1,25,000 PUPILES, 4000 STAFF, CURRENT BUDGET RS. 160 CRORES.**
- **ALL COLLEGES AND SCHOOLS ARE ISO 9001:2000 CERTIFIED.**
- **THE SOCIETY IS KNOWN FOR STUDENTS' DISCIPLINE, ACADEMIC EXCELLENCE, PROFESSIONAL COMPETENCE AND INNOVATIVE PROGRAMMERS WITH A TRACK RECORD OF STUDENTS AND STAFF ACHIEVEMENTS.**
- **SOCIETY'S COLLEGES HAVE PERMANENT AFFILIATION AND RECOGNITION FOR PH.D. PROGRAMMES.**
- **INTERNATIONALLY KNOWN FOR MAKING HIGHER AND TECHNICAL EDUCATION ENTREPRENEURIAL INNOVATIVE AND REWARDING THROUGH THIS NASIK CENTRE (CERTIFIED AT 44TH INTERNATIONAL CONFERENCE- UNIVERSITY OF TWENTE, NETHERLAND- HOLLAND.**

## PIONEERING WORKS

- **ESTABLISHED FIRST AGRICULTURE SCHOOL FOR ADIVASIS IN INDIA, 1920 AT BORDI, DIST. THANE.**
- **ESTABLISHED FIRST UNIVERSITY BASED MBA PROGRAMME IN INDIA, 1968 AT NASHIK UNDER POONA UNIVERSITY.**
- **FIRST KRISHI VIDYNAN KENDRA IN INDIA, 1975 AT KOSBAD, DIST. THANE.**
- **FIRST VOCATIONALISATION OF UNIVERSITY DEGREE IN INDIA, 1983 AT BYKCOLLEGE, NASIK.**
- **PACE SETTING EXPERIMENT AT NATIONAL LEVEL- HINDUSTAN AERONAUTICAL LTD. – HAL:GES AGREEMENT FOR SCHOOL & COLLEGE COMPLEX SINCE 1970 AT OZAR, DIST. NASIK.**





GOKHALE EDUCATION SOCIETY'S • SIR DR. M. S. GOSAVI POLYTECHNIC INSTITUTE, NASHIK ROAD

॥ योगः कर्मसु कौशलम् ॥

Gokhale Education Society's

# SIR DR. M. S. GOSAVI POLYTECHNIC INSTITUTE,

Nashik Road, Nashik- 422 101

## VISION

***To Empower the youth with competencies for Smart Performance.***

***To Nurture Value – Oriented Skilled Manpower thro' Quality Technical Education.***

***To Achieve Excellence in Capacity Building.***

## MISSION

***To Impart High Quality Skill-based Technical Vocational Education to Suit Changing Times.***

***To Provide Opportunities for Inter-disciplinary Learning to Meet Global Challenges.***

***To Build Technical Competencies for, "Manufacturing In India"***

## संपादकीय समिती



**मुख्य संपादक**
प्रा. प्रदीप देशपांडे
संचालक

**कार्यकारी संपादक**
श्री. शैलेश गोसावी
आस्थापना संचालक

**शैक्षणिक संपादिका**
डॉ. सौ. श्रद्धा देशपांडे
प्राचार्या

**समन्वयिका**
सौ. गौरी बोराडे
ग्रंथपाल

**सह समन्वयिका**
कु. दिपाली आहेर
सहाय्यक ग्रंथपाल

सदर अंकातील लेखांमधील **विचारांशी** संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. हि मते त्या त्या लेखांच्या लेखकांची आहेत.



# अनुक्रमणिका



| अ. नं. | शीर्षक | नाव | वर्ग | पान नं |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्या मनोगत | डॉ. सौ. श्रद्धा देशपांडे | प्राचार्या | ९ |
| २ | प्रस्तावना | सौ. गौरी प्रशांत बोराडे | समन्वयक | १० |
| ३ | बदलते दिवाळीचे स्वरूप | दिपाली वि. आहेर | सहाय्यक ग्रंथपाल | १२-१४ |
| ४ | **Artificial intelligence (AI)** | भगवंत बा. हांडगे | संगणक विभाग प्रमुख | १५ |
| ५ | **Article on 'Eco-friendly Diwali Celebration** | **Prof. Sonal R. More** | **Lect. In Chemistry** | १६-१७ |
| ६ | **Rangoli** | **Janhavi Pawar** | **SYCO** | १८-१९ |
| ७ | तारुण्यकाळ | दिपाली वि. आहेर | सहाय्यक ग्रंथपाल | २० |
| ८ | शिवरायांसी आठवावे | अदिती बुवा | **FYEE** | २१-२३ |
| ९ | शिवरायांचे आठवावे रूप | अश्विनी वाघचौरे | **FYEE** | २६-२७ |
| १० | **Unveiling the Path to Unleashing Your Best Self: The Art of Personality Development** | **Ms. Priyanka Shejwal** | **Office Clerk** | २८-२९ |
| ११ | दिवाळीचे वेध | वैष्णवी लासुरे | **TYCE** | ३१ |
| १२ | आयुष्याला द्यावे उत्तर | विं. दा. करंदीकर | कवी | ३२ |
| १३ | मी कुणाला कळलो नाही - सुरेश भट | सृष्टी दरंदले | **SYCO** | ३३ |
| १४ | जगता आलं पाहिजे... | मराठी संस्कृती | - | ३४ |
| १५ | आयुष्य | सौ. गौरी प्र. बोराडे | ग्रंथपाल | ३५ |
| १६ | आजकालची तरुण पिढी | दिपाली वि. आहेर | सहाय्यक ग्रंथपाल | ३६ |
| १७ | होतंका हो आयुष्यात तुमचं कधी असं ? | ईशा बच्छाव | **TYCO** | ३७ |
| १८ | निसर्ग, मैत्री | प्रा. दीपाली थोरात | **Lect. In Computer** | ३८ |
| १९ | बापाच काळीज | अदिती बुवा | **FYEE** | ३९ |
| २० | मुलीच्या नजरेतला बाप | अदिती बुवा | **FYEE** | ४०-४१ |
| २१ | **Memories of yester years** | **Kshirsagar Siddhi** | SYCO | ४२ |
| २२ | सौंदर्य | भगवंत बा. हांडगे | संगणक विभाग प्रमुख | ४४ |
| २३ | आठवणी, आम्ही पुणेकर | सौ. गौरी प्र. बोराडे | ग्रंथपाल | ४५ |
| २४ | निसर्गछायाचीत्रे | - | - | ४८-५४ |
| २५ | रेखाटने | - | - | ५६-५८ |
| २६ | पाककृती | - | - | ६०-६७ |





## प्राचार्या मनोगत.......

**प्रिय** वाचक...

'संचितकल्प' ई दिवाळी अंक २०२३ आपल्या हाती देतांना मला **विशेष** आनंद होत आहे. सदर वर्ष हे ई दिवाळी **विशेषांक** २०२३ चे **द्वितीय** प्रकाशन वर्ष आहे. गत वर्षीपासून मी प्राचार्य पदाचा कार्यभार पाहत आहे. हा पदभार सांभाळण्यासाठी मला संस्थेचे माजी **सचिव** कै. सर डॉ. मो. स. गोसावी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. **सचिव** व मानव संसाधन **संचालिका** डॉ. सौ. दीप्ती देशपांडे, प्रकल्प संचालक प्रा. प्रदीप देशपांडे, आस्थापना संचालक श्री. शैलेश गोसावी यांचे प्रोत्साहन **मिळाले** या साठी मी त्यांची शतशः ऋणी आहे.

'संचितकल्प' ई दिवाळी अंक २०२३ हा समन्वयिका, सह समन्वयिका, सर्व **विभाग** प्रमुख, **शिक्षक**, **शिक्षकेतर** कर्मचारी व माझे लाडके **विद्यार्थी** यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे **प्रसिध्दिस** आणणे शक्य झाले आहे. यातून वाचकांस **विविध** वाचनसाहित्य वाचनासाठी उपलब्ध झाले आहे.

"योग कर्मसु कौशलम" या आपल्या **महाविद्यालयाच्या** ब्रीद वाक्याप्रमाणे आपण **विद्यार्थ्यांमधील** सुप्त गुण कौशल्यांना **विकसित** करण्याचा वसा हाती घेतला आहे. यासाठी **'संचितकल्प'** ई दिवाळी अंक एक मंच म्हणून आपणास उपलब्ध करून दिले आहे. **विद्यार्थी** व कर्मचारी यांनी या संधीचा लाभ घेत दैनंदिन जबाबदाऱ्या पार पाडत स्वतःसाठी, स्वतःचे छंद जोपासण्यासाठी वेळ द्यावा, हाच या उपक्रमाचा हेतू आहे. 'ज्ञानदीप लावू जगी' या वाक्याचा आपल्या दिवाळी अंकासाठी अगदीच समर्पक असा उपयोग होताना दिसतो आहे. गतवर्षातील प्रथम ई दिवाळी अंकाचे प्रकाशन हे ४० दीप (पृष्ठे) लावून झाले होते. या वर्षी आपण ७० दीपांची (पृष्ठांची) माळ गुंफण्यात यशस्वी झालो आहोत. असेच सर्वांचे योगदान सदर उपक्रम प्रभावीपणे चालू ठेवण्यास उपयोगी पडते आहे. हा ज्ञानरूपी घेतलेला वसा असाच **अविरत** सुरु ठेऊ.



डॉ. सौ. श्रद्धा देशपांडे
प्राचार्या





## प्रस्तावना

गोएसो च्या शतकपूर्ती सोहळ्याचे साक्षीदार म्हणून सर. डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतनची स्थापना करण्यात आली. गोसावी सरांचे स्वप्न पूर्ण झाले **आणि** २५ जून २०१६ रोजी हि वास्तू तयार झाली. स्वप्न पहाणे व ते अस्तित्वात येऊन अनुभवयास **मिळणे** यासारखी आत्मशांती दुसरी नाहीच. सरांनी उभारलेल्या अनेक दीपस्तंभापैकी एक म्हणजे सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतन. हा दीपक सदैव तेवत ठेऊन त्याचा प्रकाश दाही दिशांना उजळावा यासाठी तंत्रनिकेतनचा भाग असलेले सर्व कर्मचारी **विद्यार्थी अविरत** प्रयत्नशील असतात. यासाठी वेळोवेळी **विविध** उपक्रम राबवत असतात. यापैकीच एक म्हणजे **'संचितकल्प'** ई दिवाळी अंक.

**'संचितकल्प'** ई दिवाळी अंक २०२३ हा आमचे पालक श्री श्रेष्ठ कै. सर डॉ. मोरेश्वर **सदाशिव** गोसावी सरांना व आईस्वरूप कै. डॉ. सौ. सुनंदाताई मोरेश्वर गोसावी यांना आदरांजली म्हणून अर्पण.

**'संचितकल्प'** म्हणजेच आपल्या मनात साठलेल्या कल्पनारूपी **विचारांचा** संच **किंवा** साठा. सदर ई दिवाळी अंक २०२३ हा आपला **द्वितीय** अंक आहे. प्रथम अंकात सर्व **विद्यार्थी** व प्राध्यापकांनी त्यांच्या सुप्त कल्पनांना मोकळी वाट करून दिली **आणि** प्रथम ई दिवाळी अंकाची **निर्मिती** झाली. दिवाळी अंक हा केवळ **विचारच** नव्हे तर व्यक्ती स्वातंत्र्य जपण्याची भूमी आहे असे म्हणूयात. म्हणूनच तर सदर अंकात लेख, **कविता,** चारोळ्या, **विनोद, निसर्ग चित्रे,** रेखाटने, पाककृती अश्या **विविध** साहित्याला वाव दिला जात आहे. **विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच** त्यांच्या छंदांना जोपासण्याची संधी या अंकाने उपलब्ध करून दिलेली आहे. दिवाळी म्हटली **कि** आपल्यासमोर येते ती रोषणाई, **अगणित** दिव्यांची लागण; याही अंकात आपणास **विद्यार्थ्यांनी** टिपलेली त्यांची **निसर्गछायाचित्रे** या अंकास चार चांद लावत आहेत. दिवाळी म्हटली **कि** आठवते पाडवा पहाट व सुंगंधी उटण्याची साथ; इथेही आपणास **विद्यार्थ्यांच्या रेखाचित्रे** व **कवितांचा** मेळ पहावयास **मिळणार** आहे. दिवाळी म्हटली **कि** आवडता फराळ **विसरून** कसा चालेल; यासाठी आपले **विद्यार्थी** चारोळ्या, **विनोद** व पाककृती यांची मेजवानी घेऊन येत आहेत. असा परिपूर्ण अंक ज्येष्ठांच्या **आशिर्वादाशिवाय** अपूर्णच; म्हणूनच प्राचार्यांच्या मनोगताने अंकाची सुरुवात केली आहे.



सौ. गौरी प्रशांत बोराडे

ग्रंथपाल व समन्वयिका




सदर पहिले
लेख

# बदलते दिवाळीचे स्वरूप

सण-उत्सव हे भारतीयांच्या **किंबहूना** संपूर्ण मानवी समाजाच्या जीवनाचा एक **अविभाज्य** अंग आहे. हिंदू धर्मातील सण, उत्सव, व्रते यामागे शास्त्र **आणि** शास्त्रीय कारण आहे. वर्षाचे बारा महिन्यात येणारे सण **आणि** त्या काळात असणारे ऋतुचक्र यांची सांगड घालून त्याचा मनुष्याला लाभ व्हावा हा उदात्त हेतू यामागे असावा **आणि** आहे. प्रत्येक सणाचे शास्त्र समजून घेऊनच सण साजरे केले तर त्याचा लाभ होईल असे मला वाटते. युगानुयुगे चालत आलेल्या या सणाचे स्वरूप आता बदलत चालले आहे हे एक कटू सत्य आहे.

'तमसो मा ज्योतिर्गमय' अशी प्रार्थना आपण करतो. याचा अर्थ मला अंधारातून प्रकाशाकडे ने, माझे मन काळोखाने, अंध:काराने नाही, तर प्रकाशाने भरून जाऊ दे **आणि** माझ्या हातून तसेच तेजस्वी काम घडू दे. असाच अज्ञानाच्या अंधःकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा सण म्हणजे दिवाळी! **विविध** रंगांचा **आणि** दिव्यांचा सण म्हणून दिवाळी म्हणजेच दीपावली साजरी केली जाते. संपूर्ण भारतातच नव्हे तर जगात दिवाळी मोठ्या उत्साहाने साजरा केली जाते. प्रत्येक प्रांत, देश यामध्ये तेथील चालीरीती नुसार सण साजरा होतो. "दिवाळीचा सण मोठा, नाही आनंदाला तोटा" असे म्हटले जाते.

दीपावली या शब्दाची उत्पत्ती दोन संस्कृत मधील शब्दांच्या उच्चाराने झाली. 'दीप' म्हणजे 'दिवा' **आणि** 'आवली' म्हणजेच 'ओळ'. याचा संपूर्ण अर्थ पाहिला तर दिव्यांची एका ओळीत केलेली रचना अर्थात दिवाळी. काही जण दिपवाळी असे देखील म्हणतात, पण शुद्ध शब्द दीपावली हा आहे. चौदा वर्षांचा वनवास संपवून प्रभू श्रीरामचंद्र अयोध्येला परत आले, त्या वेळी प्रजेने दीपोत्सव केला. अशी कथा आहे यानुसार पूर्वापार हा सण साजरा केला जात आहे.

दिवाळी हा सण **पावित्र्याचा** मांगल्याचा **आणि** आनंदाचा आहे. दिवाळीच्या धर्माचरणाच्या अंतर्गत **येणाऱ्या** तेलाच्या पणत्यांची आरास करणे, पाच दिवस **सांगितलेल्या विविध** पूजा **आणि धार्मिक** कृती करणे, नवीन वस्त्रे **आणि दागिने** परिधान करणे, नातेवाइकांना भेटणे, त्याचप्रमाणे रांगोळ्या, फराळ, आकाशदिवे आदी गोष्टी पुरेशा आनंद देणार्या, आहेत. धर्मशास्त्र समजून घेऊन त्यानुसार सण-उत्सव साजरे केले, तर त्याचा आध्यात्मिक लाभ होतो. धर्मशास्त्र माहीत नसल्यामुळे हिंदूंच्या **धार्मिक** सणांत अपप्रकारांना उधाण येत आहे. काळानुसार दीपावलीचे स्वरूप बदलत आहे. अर्थात काळाप्रमाणे जगणेही बदलत जाते, तसे उत्सवही बदलले. काळाप्रमाणे बदल हा आवश्यक असतो पण काळाच्या ओघात **किती** बदलावे याचीही समज असावी. बदल हा निसर्गाचा नियम आहे. हा बदल आपल्या परंपरा हि बदलत आहे, नव्हे तर त्या काळाच्या ओघात लुप्त होत आहे.

दिवसेंदिवस दिवाळी सणामधील घरगुतीपण हरवत चाललेय. कंदील-पणत्यांपासून फराळ-

**मिठायांपर्यंत** सारेच बाहेरून आणले जाते. परंपरा हरवत दिवाळी **वर्षांगणिक** आधुनिक होत चाललीय. पूर्वी दिवाळी मध्ये लहान मुले आकाशकंदील स्वतः बनवत होते. **वडिलधाऱ्यांकडून** मुलांना **आकाशकंदिल** बनवण्याचे धडे दिले जायचे. आता सरळ बाजारातून रेडीमेड नव्हे तर चायनीज आकाशकंदील आणले जातात. लाइटिंग लावली जाते. काही ठिकाणी तर दारातील पणत्यांची जागा मेणबत्त्यांनी घेतली आहे. दिवाळी हा प्रकाशाचा सण असा शब्दशः अर्थ घेऊन शेकडो वॅटची **उधळपट्टी** होते.

दिवाळी म्हटले **कि** दिवाळी फराळ हा आकर्षणाचा **आणि** आवडीचा **विषय**. घरातील गृहिणी **नानाविविध** प्रकारचे खाद्य पदार्थ बनवत होत्या. घरातल्या फराळासाठीची लगबग **किमान** सात-आठ दिवस आधीपासूनच सुरू व्हायची. पण आजकाल ते फार कमीच बघायला **मिळते**. घरातील सर्व गृहिणी **मिळून** नवीन पदार्थ बनवण्याचा आनंद आता खाद्य पदार्थ **विकत** आणण्यात शोधतात. तसेच दिवाळी म्हटले **कि** रांगोळी आलीच. देवघरात, घरासमोर सडासंमार्जन करून पूर्वी ठिपक्यांची रांगोळी काढली जायची. हळूहळू तिचे रूपांतर **डिझायनर** रांगोळीमध्ये झाले. आता मात्र तिची जागा **डिझायनर** चाळणींच्या इन्स्टंट रांगोळ्यांनी घेतली. हाताने काढल्या जाणाऱ्या लक्ष्मीची पावलं आता स्टीकर्सच्या स्वरूपात **चिटकवली** जाऊ लागली आहे.

दिवाळीमध्ये अभ्यंगस्नान केले जाते. त्यामागेही शास्त्र आहे. दिवाळीपासून वाढणाऱ्या थंडीमुळे अंग शुष्क होऊ नये, यासाठी दिवाळीत तेलाने अंगमर्दन **आणि** नंतर उटणं लावून गरम पाण्याने स्नान करण्याची परंपरा आहे. परंतु, हे अभ्यंगस्नानही आता एक उपचार म्हणून उरकलं जातं. उटण्याऐवजी सुगंधी साबणाला प्राधान्य दयायला लोकांनी कधीच सुरुवात केलीय. व्यापारी **गणितांनी** परंपरेवर मात केल्याचं हे एक उत्तम उदाहरण. आपल्या आनंदाच्या साऱ्या व्याख्या सध्या 'लक्ष्मी'शी जोडलेल्या आहेत. त्यामुळे घरात अर्थसंपन्नता राहावी यासाठी लक्ष्मीपूजन मात्र न चुकता केलं जातं. **यमद्वितीया** अर्थात भाऊबीज. या दिवशी यम आपल्या बहिणीकडे भोजनास गेला, अशी पुराणकथा आहे. त्यामुळे भावाने **बहिनीच्या** घरी जेवायला जायची परंपरा रूढ होती. पण आता यामध्येही बदल दिसतो. घरी भावाचे औक्षण करून फराळ केले जात होते. त्याची जागा महागड्या रेस्टॉरंट **बुकिंगने** घेतली आहे. असे असले तरी बहीण भावाच्या नात्यात ओलावा जीवंत आहे हे तरी भाग्यच म्हणावं.

अजून दिवाळी म्हटले **कि** फटाक्यांना **विसरून** कसे चालेल, हो ना? फटाक्यांची डोकेदुखी मात्र कायमचीच आहे. एका ठरावीक आवाजापेक्षा जास्त **आणि** ठरावीक वेळेनंतर फटाके फोडू नयेत, असे नियम असले तरी, सारे सरकारी नियम धाब्यावर बांधून रस्तोरस्ती सांस्कृतिक 'अतिरेक्यांचे' बॉंबस्फोट सुरू असतात. मोठे फटाके फोडल्याने

मोठा आनंद **मिळतो**, असा या लोकांचा दृढ समज आहे. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षांपासून आवाजी फटाके कमी झाले असून आकाशात सप्तरंगाची उधळण करणाऱ्या **आवाजाविरहीत** फटाक्यांची मागणी वाढली आहे. पण त्या फटाक्यांमुळे कानठळ्या बसत नसल्या तरी, वायूप्रदूषण प्रचंड वाढत आहे. कान,नाक, डोळे, घसा **आणि** फुफ्फुसांना यासर्वांचा त्रास सोसावा लागतो. यंदाही तशाच '**शोभिवंत**' फटाक्यांची बाजारात चलती आहे.

दिवाळी हा एकमेकांना गोड शुभेच्छा देण्याचा सण. पूर्वी प्रत्यक्ष भेट शक्य नसली तर, खास शुभेच्छापत्रं तयार करून ती पोस्टाने आप्तस्वकीय **आणि मित्रमंडळींना** पाठवली जायची. आजच्या आधुनिक काळात त्यांची जागा मोबाईलवरच्या एसएमएसनी घेतली आहे. नाहीतर व्हॉटसअपद्वारे न वाचता फॉरवर्डेड संदेश पाठवले जातात.

व्हॉटसअपच्या ग्रुपवर एक शुभेच्छा पेस्ट केली की सर्व **मित्रांना** स्वतंत्र शुभेच्छा **पाठविण्याची** गरज राहिलेली नाही.

मोठ्या शहरांमध्ये दिवाळी साजरी करण्याचे स्वरूप काही प्रमाणात बदलले आहे. तरीही ग्रामीण भागात **आणि** काही अंशी शहरी भागात अजूनहि परंपरा, रूढी, चालीरीती जोपासल्या जातात. अश्या प्रकारे सर्वांगाने दिवाळीचे नव्हे तर दिवाळी साजरे करण्याचे स्वरूप बदलत चालले आहे. याला केवळ समाजच जबाबदार नाही तर कुठे ना कुठे आजचे धावपळीचे **आणि** धकाधकीचे जीवनही तितकेच जबाबदार आहे.

आपल्या संस्कृतीने एवढा नयनरम्य **आणि** डोळे दीपवणारा दिलेला दीपोत्सव केवळ मजा करण्याच्या नावाखाली धूर **आणि** आवाज यांच्या अतिरेकात वाया न घालवता दिवाळीच्या दिवसांत **अधिकाधिक** साधना (म्हणजेच नामजप, प्रार्थना, दान आदी) करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. दीपावलीच्या **निमित्ताने** समाज, राष्ट्र अन् धर्म यांसाठी काहीतरी करण्यासाठी यथाशक्ती पाऊल उचलले, तरच हा सण **खऱ्या** अर्थाने साजरा होईल.

आज मोठ्या प्रमाणावर एकोपा जोपासणारा सण म्हणून दिवाळी-पाडव्याकडे पाहिले तर वावगं ठरणार नाही.




- कु. दिपाली **विठ्ठल** आहेर,
सहाय्यक ग्रंथपाल.

# Artificial intelligence (AI)

**Artificial intelligence (AI)** चा वापर तेजीने वाढत आहे नवनवीन टूल्स नवीन वेबसाइट्स **आणि** ॲप्स एकामागोमाग मार्केट मध्ये येत आहेत, ही नवीन टेक्नलॉजी फायद्यासोबतच भरपूर नुकसान दायक देखील आहे त्यामुळे त्याची दुसरी "काळी" बाजू देखील समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे.
समजून घेऊ **आणि** नुकसानापासून वाचू आज गुगल-फेसबुक हे आपल्याला आपल्या कुटुंबीयांपेक्षा **आणि मित्रांपेक्षा** चांगले ओळखते असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. आता नवीन नवीन AI गुगल वर सर्च करण्याची पद्धती, डाटा **मिळविण्याच्या** पद्धती तेजीने बदलत आहेत. **आणि** सोबतच प्रचंड वेगाने आपली वैयक्तिक माहिती देखील गोळा करीत आहेत.GPS लोकेशन सर्वच इंटरनेटला लगेच कळतं त्याचा वापर कसा केला जातो जाऊ याचा तुम्ही अंदाज पण करू शकत नाही.
काही वर्षांपूर्वी झालेली फेसबुक वरील खटला तुम्हाला माहित असेल फेसबुक ॲप आपली वैयक्तिक माहिती घेताच होत सोबत ॲप बंद असताना देखील माईक **आणि** मोबाईल फाईल ॲक्सेस झाल्याच्या घटना घडल्या. आजच आपण बँक लेटर असो **किंवा** पर्सनल लेटर AI कडून **लिहून** घेतो **आणि** सोबतच आपली माहिती देखील त्यात टाकतो, लक्ष्यात ठेवा हे तंत्रज्ञान त्याला दिलेली माहिती साठवते त्यामुळे कोणतीही वैयक्तिक माहिती इथे टाकू नका.
मोबाईल मध्ये AI ॲप्स घेत असाल तर त्याला आपण कोणत्या **परमिशन** देत आहोत हे काळजीपूर्वक बघा, जर कामाव्यतिरिक्त **परमिशन** ॲप मागत असेल तर तात्काळ **डिलीट** करा. यालाच **अनधिकृत** डेटा हार्वेस्टिंग म्हटले जाते. AI-**संचलित** मोबाइल ॲप्लिकेशन्स एकदा परवानगी **मिळाल्यावर**, संपर्क, **ब्राउझिंग** इतिहास **आणि** SMS मधील मजकूर यासारखी अतिरिक्त माहिती शांतपणे **संकलित** करू शकतात. हा डेटालक्ष्यित जाहिराती, ओळख चोरी **किंवा** इतर हेतूंसाठी वापरला जाऊ शकतो. स्मार्ट होम **डिव्हाईसेस आणि** व्हॉइस **असिस्टंट** AI-**चलित** स्मार्ट होम उपकरणे **आणि** व्हॉईस **असिस्टंट अधिकाधिक लोकप्रिय** झाले आहेत. अशी काही उदाहरणे आहेत जेव्हा ही उपकरणे अनवधानाने वापरकर्त्यांच्या स्पष्ट **संमतीशिवाय** खाजगीसंभाषणे रेकॉर्ड करतात **आणि** प्रसारित करतात. हे आपल्या वैयक्तिक आयुष्यावर दूरगामी परिणाम करू शकतात. प्रत्येकाला त्यांच्या पसंती नुसार वेगवेगळ्या जाहिराती दिसतात, हे होते AI अल्गोरिदम मुळे, त्यानुसारच तुमची राजकारण **आणि** सामाजिक आवड **आणि** तेढ हे AI व्यवस्थित समजून घेत आहेत **आणि** त्यानुसार जाहिराती **आणि** राजकारणासाठी अयोग्य वापर करून तुम्हाला एक वेगळ्याच भ्रमात ठेवण्याची क्षमता देखील आपण या AI ना देत आहोत. सोबतच सामाजिक तेढ **आणि** भांडण देखील काही चुकीच्या जाहिरातींमुळे होताना दिसतात.
तंत्रज्ञान वेगाने **विकसित** होत आहे, त्यापासून पळू नका योग्य रित्या समजून घ्यासावध राहा **आणि** तंत्रज्ञानाचे गुलाम न होता तंत्रज्ञानाला तुमचा गुलाम करा त्याचा योग्य वापर करा.

- भगवंत बाळासाहेब हांडगे
संगणक विभाग प्रमुख





# Article on 'Eco-friendly Diwali Celebration'

**Diwali**, the festival of lights is now celebrated by many from across the world. The Indian traditional festival has its own significance, where people bring in joy and light by lighting diyas and lighting firecrackers. But, not everyone thinks about the pollution caused by the same!

An **eco-friendly Diwali celebration** is nothing but celebrating in a way that does cause harm to our ecosystem, and that includes all the living beings. One can start by just lighting diyas and avoiding loud and smoke filled firecrackers.

## Tips or Ideas to celebrate an Eco-friendly Diwali

Following are some of the best ideas and tips that we can use to celebrate green/eco-friendly **Diwali**.

**1. Use Earthen Diyas Instead of Plastic Diyas:-** All of us know how harmful is plastic to the environment. It is a non-biodegradable substance that pollutes air, water, and earth drastically. Therefore, we must use earthen lamps and diyas. There are two benefits of using earthen diyas – first, it will not harm the environment, and second, it will support potters whose livelihood depends upon the sale of these items.

**2. Use Green or Eco-friendly Crackers:** Firstly, we should avoid burning crackers on Diwali because we have so many other ways to celebrate the festival. However, burning crackers is one of the best activities for children during festivals. Therefore, we can use eco-friendly crackers available in the market. Such crackers have been manufactured keeping in mind the environmental needs.


**3. Use Organic and Natural Colours for Rangoli:** The festival of Diwali is incomplete without rangolis. The colours used in making rangolis are non-biodegradable and harmful to health. The toxic compounds present in non-organic colours may lead to severe respiratory issues if they are inhaled. Therefore, we must use organic and natural colours, which are eco-friendly. Using natural substances like flower petals and turmeric powder are some best eco-options for rangoli making.





**4. Use Solar Lights to Save Energy:** Lighting is an important part of Diwali, since it is a festival of lights. People use different types of lighting to decorate their houses, which leads to a lot of electricity wastage. This Diwali, try using solar lights to celebrate a green Diwali.

**5. Use Air purifiers to Avoid Pollution:** Burning crackers during Diwali releases a lot of smoke that may be harmful to health, especially to people who have respiratory disorders. Use air purifiers that will not only clean the air but also prevent pollution.




## Importance of Eco-friendly Diwali

1. Eco-friendly Diwali helps reduce noise and air pollution.
2. We can quickly reduce the consumption of energy by opting for eco-friendly
3. Earthen diyas are perfect and can easily be disposed of without causing harm to our atmosphere.
4. The use of organic colours also helps to avoid any kind of skin irritations.



**Prof. Sonal Ravirao More**
**Science and Humanities (Chemistry)**







# Rangoli

Rangoli is an art form that originates from in the Indian subcontinent, in which patterns are created on the floor or a tabletop using materials such as powdered lime stone, red ochre, coloured sand, quartz powder, dry rice flour, flower petals, coloured rocks. It is an everyday practice in many Hindu households, however making it is mostly reserved for festivals and other important celebrations as it is time consuming. Rangolis are usually made during Diwali or Tihar, Onam, Pongal, and other Hindu festivals in the Indian subcontinent, and are most often made during Diwali. Designs are passed from one generation to the next, keeping both the art form and the tradition alive.

Rangoli have different names based on the state and culture.In North India "Rangoli", "kolam" for Tamil and Kerala, "Rangavalli" in Andhra Pradesh while it is called "Alpana" in Bengal. Rangoli hold a significant role in the everyday life of a Hindu household especially historically when the flooring of houses were untiled. They are usually made outside the threshold of the main entrance, in the early mornings after cleaning the area. Traditionally, the postures needed to make a rangoli are a kind of exercise for women to straighten their spines. The rangoli represents the happiness, positivity and liveliness of a household, and is intended to welcome Lakshmi, the goddess of wealth and good luck. It is believed that a Hindu household without a clean entrance and rangoli is an house of daridra (bad luck).

The purpose of rangoli is beyond decoration. Traditionally either powdered calcite and limestone or cereal powders are used for the basic design. The limestone is capable of preventing insects from entering the household, and the cereal powders attract insects and keep them from entering the household. Using cereal powders for rangoli is also believed as panch-mahabhoota Seva because insects and other dust microbes are fed. Design depictions may vary as they reflect traditions, folklore, and practices that are unique to each area. Rangoli are traditionally made by girls or women, although men and boys create them as well. In a Hindu household, basic rangoli is an everyday practice. The usage of colours and vibrant designs are showcased during occasions such as festivals, auspicious observances, marriage celebrations and other similar milestones and gatherings.



Rangoli designs can be simple geometric shapes, depictions of deities, or flower and petal shapes appropriate to the given celebrations. They can also be made with elaborate designs crafted by numerous people. The geometric designs may also represent powerful religious symbols, placed in and around household yagna shrines. Historically, basic designs were drawn around the cooking areas for the purpose of discouraging insects and pathogens. Synthetic colours are a modern variation. Other materials include red brick powder and even flowers and petals, as in the case of flower rangoli.



Over time, imagination and innovative ideas in rangoli art have also been incorporated. Rangoli have been commercially developed in places such as five star hotels. Its traditional charm, artistry and importance continue today.



-Janhavi Pawar
SYCO



# तारुण्यकाळ

*सळसळतं तारुण्य*
*जीवनातला हवाहवासा टप्पा*
*उद्याची स्वप्नं पाहण्याचा,*
*मैत्री-प्रेम-सहवासात डुंबण्याचा,*
***विहंगासारखे** मुक्त जगण्याचा*
*जीवनातले लक्ष्य साधण्याचा...*
*तारुण्यकाळ माणसाच्या*
*जीवनातला हवाहवासा टप्पा...*
*हवाहवासा टप्पा...*

या चारोळीसारखे जीवन तरुण **पिढीचे** असते **कदाचित** तसे जगण्याचे त्यांचे स्वप्न असते. हाच काळ सुगीचा काळ म्हणू शकतो.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वोत्तम काळ म्हणजे तरुणाईचा काळ. या कालावधीत तुम्ही जे करू शकता ते तुम्ही आधी **किंवा** नंतर करू शकत नाही. तरुण म्हणजेच जोश, चैतन्य **आणि** नावीन्याने परिपूर्ण असलेला. आपल्या आयुष्यातील हा काळ आपल्याला निर्णय कसा घ्यायचा **आणि** आपल्या भल्यासाठी योग्य निवडी कशी करायची हे **शिकवते** त्यामुळेच ज्या देशामध्ये युवा **पिढी** मोठ्या प्रमाणात आहे तो देश नेहमी प्रगतशील असतो, जसे **कि** भारत देश.

युवा ही राष्ट्राची एक सशक्त संपत्ती आहे ज्यामध्ये त्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी भरपूर ऊर्जा आहे. त्यामुळेच शासन स्टार्टअप **इंडिया** सारखे प्रकल्प तरुणांसाठी राबवते. तरुण **पिढीने** ठरवले तर देश प्रगतीकडे जाऊ शकतो. **शिवाजी** महाराजांनी तरुण **पिढीचे** महत्व समजूनच मावळे हाती घेऊन स्वराज्य निर्माण केले. त्यासोबत वेळोवेळी त्यांनी अनुभवी मोठ्या **वडिलधाऱ्यांचे** सल्ले मात्र कायम ऐकले. नाहीतर आजकाल तरुण **पिढी वडिलधाऱ्यांचे किती आणि कितपत** ऐकते हे नव्याने सांगणे नकोच.

तरुणाई हे **विकासाचे** महत्त्वाचे युग आहे. तरुण हे मूल **किंवा** प्रौढ नसल्यामुळे व्यक्तिमत्त्वात दोन्ही अवस्थांचे **मिश्रण** असते. तो काही वेळा स्वार्थी असू शकतो **किंवा** दुसऱ्याच दिवशी नि:स्वार्थी होऊ शकतो. तो एक दिवस देशभक्त **किंवा** बंडखोर देखील होऊ शकतो. तारुण्य एक **विद्रोही** व्यक्तिमत्व **विकसित** करते **आणि** अशा प्रकारे आपण कुटुंबातील मतांमध्ये संघर्ष पाहू शकतो. कौटुंबिक संबंध बिघडण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. तरुण स्वभावाने वादग्रस्त असल्याने, योग्य तर्क **आणि** निर्णय घेण्याची वृत्ती **विकसित** करतात. अशाप्रकारे, ते कोणत्याही गोष्टीला योग्य **कारणाशिवाय** सत्य म्हणून स्वीकारण्यास नकार देते. नैतिक प्रबोधनाचा अभाव **किंवा** नैतिक **आणि** नैतिक मूल्यांचे पालन करण्यास त्याने पूर्ण नकार दिला असे नाही. आपल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **मिळावे** अशी त्याची इच्छा असते **आणि** त्याचा शोध पूर्ण झाल्यावर तो तेच स्वीकारतो. त्यांना प्रत्येक प्रश्नाचे वैज्ञानिक उत्तर हवे असते. त्यामुळेच तरुण **पिढीला** मतदानाचा **आणि** वाहन चालवण्याचा **अधिकार** याच वयात **मिळतो.**

उत्कटतेने **आणि** उर्जेने भरलेले मोठे स्वप्न साकार करण्यासाठी तारुण्य हा सुवर्णकाळ आहे. जरी, हा कालावधी साहसांनी भरलेला असला तरीही ते उघड्या डोळ्यांनी पाहावे लागतील. हीच ती वेळ आहे जेव्हा आपण समाजाच्या **आर्थिक विकासासाठी** आपल्या कल्पनांना आकार देऊ शकतो. नाटक, प्रकल्प, खेळ **आणि** इतरांमध्ये **सक्रिय** भाग घेण्यास प्रोत्साहित करून, अति रम्य गोष्टींवर नियंत्रण ठेवण्याचे चांगले मार्ग आहेत. तसेच, हीच वेळ आहे गंतव्याकडे जाण्याची जी व्यावसायिक जागरूकता **आणि** वैयक्तिक मतभेदांच्या गंभीर अभ्यासाद्वारे शक्य होऊ शकते.

जबाबदारी **आणि** मजा, नवीन वातावरण, उत्साह, रोमांच, टाळ्या **आणि** पश्चात्ताप यांच्या **मिश्रणाने** त्याचे जीवनात खूप महत्त्व आहे. ज्ञानाबरोबरच शहाणपण **मिळवण्याची** ही वेळ आहे. देशाची प्रगती हि तरुण **पिढीच्याच** हातात आहे.

- कु. दिपाली विठ्ठल आहेर,
सहाय्यक ग्रंथपाल

## शिवरायांसी आठवावे



"**शिवरायांच्या** जन्मापूर्वी **विजापूरची** आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही **आणि** दिल्लीची मुघलशाही यांच्या त्रासाने **आणि** जुलमी अत्याचाराने सारा महाराष्ट्र होरपळून गेला होता . त्यावेळी सह्याद्रीच्या कुशीत **शिवनेरी किल्यावर** १९ फेब्रुवारी१६८० रोजी एका वीरपुत्राचा जन्म झाला. तो वीरपुत्र म्हणजेच छत्रपती **शिवाजी** महाराज! त्यावेळी महाराष्ट्रातील सुलतानी राजवटीमुळे सामान्य जनता त्रासून गेली होती. त्यावेळी **शिवाजी** महाराज म्हणजे जनतेला अगदी देवदूतासारखे वाटत होते. जिजामाता **आणि** शाहाजीराजे भोसले यांच्या पोटी जन्म घेतलेला **बालशिवाजी** सह्याद्रीच्या कड्या कपारीत खेळू लागला- बागडू लागला. **शिवाजी** महाराज यांचे पूर्ण नाव **शिवाजी** शाहाजीराजे भोसले असे होते. जिजामाता **आणि** शाहाजीराजे यांना दोन वीरपुत्र होते. ज्येष्ठ पुत्र संभाजी शाहाजी राजे भोसले **आणि** धाकटा पुत्र म्हणजे **शिवाजी** शाहाजीराजे भोसले. त्यावेळी शहाजीराजे भोसले **विजापूरच्या** दरबारात सरदार होते म्हणून त्यांच्याजवळ संभाजी राजे होते. **विजापूरवर** हल्ला झाला त्यावेळी संभाजी राजे यांना युद्ध करावे लागले **आणि** युद्ध करता करता त्यांना वीर मरण आले. त्यावेळी राजमाता जिजाऊ राणीसाहेब ह्या पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहराजवळ असलेला **शिवनेरी** गडावर होत्या. संभाजीराजे यांना वीर मरण आले हे राजमाता जिजाऊ यांना कळल्यावर खुप दुःख झाले. राजमाता जिजाऊ यांच्या जवळ फक्त **शिवाजी** महाराज होते. ते त्यावेळी लहान होते. मग जिजामाता यांनी ठरवले की आपण आता दुःख करत बसायचे नाही. **शिवाजी** महाराज यांना शूर बनवायचे.

जिजामाता **आणि** दादाजी कोंडदेव यांच्या मार्गदर्शनाखाली **शिवरायांना** राजकारणाचे **आणि** राज्यकारभाराचे धडे **मिळू** लागले. दादाजी कोंडदेव हे **शिवाजी** महाराज यांचे गुरू होते. रामायण, महाभारतातील गोष्टी मधून त्यांचे बालसंस्कार होऊ लागले. लहानपणापासून जिजाबाईंनी त्यांच्या मनात हिंदवी स्वराज्याचे स्वप्न रुजवले. बालपणी जिजाबाईनी **शिवरायांना** शूर वीर पुरुषांच्या व संतांच्या गोष्टी सांगून त्यांचे बालपण शूर केले. दादाजी कोंडदेव यांनी लहानग्या **शिवबास** लष्करी **शिक्षण** दिले. **शिवरायांना** लहानपणापासूनच लढाई करणे, खेळणे फार पसंत होते. वयाच्या बाराव्या

वर्षा पर्यंत त्यांनी माता जिजाऊ **आणि** शाहाजीराजे यांनी नेमलेल्या गुरु कडुन **शिक्षण** घेतले. वयाचा चौदाव्या वर्षी **शिवरायांचा विवाह** फलटणच्या निबाळकरांची मुलगी सईबाई हिच्याशी झाला. वयाच्या १५ वर्षी **शिवाजी** महाराजांनी रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य **निर्मितीची** शपथ घेतली.

छत्रपती **शिवाजी** महाराज यांना आठ राणी होत्या. पहिली सईबाई राणीसाहेब, दुसऱ्या सोयराबाई राणीसाहेब, तिसऱ्या पुतळा बाई राणीसाहेब, चौथ्या सकवारबाई राणीसाहेब, पाचव्या सगुनाबाई राणी साहेब, सहाव्या लक्ष्मीबाई राणी साहेब, सातव्या काशीबाई राणी साहेब **आणि** आठव्या गुणवंताबाई राणी साहेब. या सगळ्या राणीसोबत लग्न करण्याचे कारण एकच ते म्हणजे एक मोठा परिवार तयार करणे. पण छत्रपती **शिवाजी** महाराज यांची लाडकी **आणि** आवडीची राणी एकच ती म्हणजे सईबाई राणीसाहेब. **शिवाजी** महाराज **आणि** सईबाई यांचा एक पुत्र होता त्याचे नाव संभाजीराजे. संभाजी राजे हे नाव **शिवाजी** महाराजाचे थोरले भाऊ संभाजी शाहाजीराजे भोसले यांच्यावरुन ठेवण्यात आले. संभाजीराजे लहान असतानाच सईबाई राणी साहेब यांना मृत्यूला सामोरे जावे लागले.

**शिवाजी** पुण्याला कारभार पाहत होते तेव्हा त्यानी राजमुद्रा तयार केली.


"प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुविश्ववन्दिता। शाहसुनो शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥ म्हणजे प्रतिपदेचा चन्द्रकोरी प्रमाणे वाढत जाणारी **विश्वाला** वंदनीय शाहाजी पुत्र **शिवाजी** यांची मुद्रा लोककल्याणासाठी शोभत आहे. इ.स. १६४५ साली लहान वयातच बाजीप्रभू, जिवा महाले, तानाजी मालुसरे सारख्या निवडक मावळ्यांसह रायरेश्वराच्या मंदिरात **शिवरायांनी** तोरणा **किल्ला** जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. **शिवरायांची** घोडदौड सुरू झाली. बारा मावळातील **किल्यामागून किल्ले** त्यांनी एक एक करत जिकून घेतले. पुरंदर, तोरणा यांच्यासारख्या **किल्यावर शिवाजीराजांनी** आपला **अधिकार प्रस्थापित** केला. त्यांचे नाव **आणि** कर्तृत्व सर्व **दक्षिणेकडे** पसरले ही बातमी आगी सारखी आग्रा **आणि** दिल्लीपर्यंत पोहोचली. अत्याचारी यवन **आणि** त्यांचे सर्व सहाय्यक राज्यकर्ते त्यांचे नाव ऐकून घाबरून जात असे. अफजलखान, शाहीस्तेखान, **सिध्दी** जोहर, **मिरझा** राजे, **जयसिंग** यांच्या रूपाने **शिवरायांवर आणि** स्वराज्यावर अनेक संकट आली ती त्यांनी समर्थपणे पेलली.
त्यांच्या सैन्यात **विविध धर्मांचे** वीर **आणि** लढवय्ये होते **आणि त्यातील** अनेक सरदार **आणि** सुभेदारही होते. खरे तर, **शिवाजींचा** सर्व संघर्ष हा धर्मांधता **आणि अहंकाराविररूद्ध** होता.
रयतेच्या सुखासाठी **आणि** भक्कम स्वराज्य निर्माण करण्यासाठी **शिवरायांनी** १६७४ मध्ये **राज्याभिषेक** करवून घेतला. स्वतंत्र साम्राज्याचे स्वप्न साकार करणारे स्वराज्य संस्थापक छत्रपती

**शिवाजीराजे** भोसले हे एक शोर-कर्तृत्ववान पुरुष होते. त्यांनी शून्यातून केलेली स्वराज्य **निर्मिती** ही सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. **शिवाजी** महाराज हे आदर्शवत स्वराज्य कारभार करण्यात यशस्वी ठरलेले. महाराष्ट्राचे पहिले छत्रपती **शिवाजी** महाराज यांचा ३ **एप्रिल** १६८० रोजी रायगड येथे मृत्यू झाला. शुन्यातून स्वराज्य निर्माण करणारा स्फूर्तिदाता राजा, मातृभक्त, **पितृभक्त** राजा, साधुसंताचा आदर करणारा, राजा दूरदृष्टी लाभलेल्या **आणि** सज्जनाचा कैवारी  असे **कितीतरी** पैलू **शिवरायांच्या** व्यक्तिमत्वाचे आहेत.
**शिवाजी** महाराजांनंतर संभाजी महाराज है **उत्तराधिकारी** होते.
त्यांनी इसवी १६८० ते १६८९ पर्यंत राज्य केले. संभाजी महाराज **शिवाजी** महाराजानंतर छत्रपती बनले. संभाजी महाराजांच्या पत्नीचे नाव येशूबाई राणी साहेब होते. त्यांचा मुलगा **आणि** वारस राजाराम होता .

छत्रपती **शिवाजी** महाराज की जय।
हर हर महादेव ||
|| जय भवानी जय **शिवाजी** ||



अदिती बुवा
**प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी**



# सायकल



तेव्हा सायकल तीन टप्प्यात **शिकली** जायची.
पहिला टप्पा कैची,
दुसरा टप्पा दांडा,
**आणि** तीसरा टप्पा सीट.

तेव्हा सायकल चालवणं इतकं सोपं नव्हतं कारण तेव्हा घरात एकच सायकल असायची जी फक्त बाबा चालवायचे.

तेव्हा साकलची उंची चोवीस इंच असायची जी उभं राहिल्यावर आमच्या खांद्या येव्हडी यायची अशी सायकल सीटवर बसून चालवणं शक्यच नव्हतं.

कैची ती कला होती ज्यात आम्ही सायकलच्या फ्रेम मधल्या त्रिकोणात घुसून दोन पायडलवर दोन पाय ठेवून सायकल चालवायचो.

**आणि** जेव्हा आम्ही अशी सायकल चालवायचो तेव्हा आम्ही छाती पुढे काढून कमरेतून तिरपं होऊन हँडलच्या मागून आमचा चेहरा बाहेर काढून ट्रींग ट्रींग करून घंटी वाजवायचो जेणे करून रस्त्यावरच्या लोकांना कळेल की आम्ही सायकल चालवतोय.

आजची **पिढी** ह्या साहसा पासून **वंचित** आहे त्यांना कल्पनाच नाही करता येणार की आठ दहा वर्षाच्या वयात चौवीस इंची सायकल चालवणं हे **विमान** उडवण्या सारखंच होतं. आठवत नाही आम्ही **कित्येकदा** आमचे गुडघे **आणि** तोंड फोडून घेतलं होतं. **आणि** आश्चर्य म्हणजे तेव्हा त्यानी अजीबात दुखायचं नाही.

पडल्यावर पटकन इकडे तिकडे बघून चड्डीला लागलेली माती झाडत गुपचुप उभं रहायचो. आता तंत्रज्ञान खूप प्रगत झालं आहे आता पाचव्या वर्षीच मुलं न धडपडता सायकल चालवतात कारण बाजारात दोन दोन फुटी सायकली आल्या आहेत. आ ण श्रीमंतांची मुलं तर थेट बाइक चालवतात तश्या छोट्या बाईक्स **मिळतात** बाजारात.

पण आजच्या मुलांना हे कधीच कळणार नाही की लहान वयात त्या मोठ्या सायकलवर संतूलन **मिळवणं** हा आयुष्यातला पहिला धडा असायचा जबाबदारीची पहिली पायरी असायची जी चढल्यावर तुम्ही गहू दळूण आणण्या लायक झालेले आहात हे नक्की व्हायचं **आणि** तुमच्यावर ती जबाबदारी टाकली जायची. जाताना दळणाचा डबा कॅरीयरवर ठेवून सायकल ढकलत चक्की पर्यन्त जायचं **आणि** येताना कैची चालवत यायचं पण खरंच ही कष्टदायक जबाबदारी पार पाडताना खूप आनंद वाटायचा.

आता कैची ही प्रथा लोप पावलेली आहे. आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी सायकल ही अशी तीन टप्प्यात **शिकली**.

आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी घरात बसून परीच्या **आणि** राक्षसाच्या गोष्टी ऐकल्या, जमीनीवर **किंवा** पाटवर बसून जेवलो बशीतून चहा प्यायला.

आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी लहानपणी घराच्या अंगणात **किंवा** पटांगणात **मित्रांबरोबर विटी** दांडू, लपाछपी,



कबड्डी, खोखो, गोट्या, भोवरे, पतंग, पावसाळ्यात खुपसणी, सूर पारंब्या, लगोरी, डबा ऐस पैस, लंगडी, ह्या सारखे परंपरागत खेळ खेळले आहेत.

आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी **मिणमिणत्या पिवळया** दिव्याच्या प्रकाशात गृहपाठ केला आहे **आणि** चांदोबा **आणि कॉमिक्स** वाचली आहेत.

आम्ही त्याच **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी आपल्या नातेवाईकांशी **मित्रांशी** भावनांची देवाण घेवाण पत्रातून केली आहे.

आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी त्यांचं बालपण कूलर, एसी, **फ्रिज,** फोन, गाडी **शिवाय** घालवलं आहे.

आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी दिवाळीत भल्या पहाटे उठून लाल रंगाचं सुगंधी तेल केसांना लावलंय **आणि** मोती **किंवा** म्हैसूर सँडल सोपनी अभ्यंग स्नान केलंय.

आम्ही त्याच शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी शाईचं पेन वापरताना वह्या, पुस्तकं, कपडे, दप्तरं **आणि** हात निळे केले आहेत.

आम्ही शेवटचे लोक आहोत ज्यांनी **शिक्षकांचा** भरपूर मार खाल्ला आहे.

आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी गोदरेजच्या गोल डब्बीतल्या साबणानी दाढी केली आहे गुळाचा चहा प्यायला आहे भल्या सकाळी काळ्या लाल **किंवा** पांढऱ्या दंतमंजनानी बोटानी दात घासले आहेत बंब पेटवला आहे बंबातल्या गरम गरम पाण्यानी आंघोळ केली आहे.

आम्ही नक्कीच ते शेवटचे लोक आहोत ज्यांनी चांदण्या रात्री अंगणात **किंवा** गच्चीवर खाटेवर झोपून **ट्रांझिस्टर** वर ऑल **इंडिया रेडिओ**, बीबीसीच्या बातम्या, **विविध** भारती, बिनाका गीतमाला ऐकलं आहे.

आम्हीच ते शेवटचे लोक आहोत जे संध्याकाळी गच्चीवर पाणी **शिंपडायचो** मग हंतरूणं घालायचो **आणि** त्यावर झोपायचो एक डुगडुगणारा पंखा सगळ्यांना वारा घालायचा **आणि** सगळ्यांना शांत झोप लागायची. सकाळी ऊन आल्यावरही तोंडावर पांघरूण घेऊन झोपून रहायचो.

आता हे सगळं नाही राहिलं डब्ब्यां सारख्या खोल्यां मधे कूलर **किंवा** एसी लाऊन रात्र होते दिवस पुढे सरकतात.

आम्ही त्या शेवटच्या **पिढीतले** लोक आहोत ज्यांनी नात्यांमधला गोडवा जपणारी **आणि** वाटणारी माणसं बघीतली आहेत जी आता दिवसें दिवस कमी होत चालली आहेत.

आता लोक जेव्हडं **शिकतायेत** तेव्हडंच स्वार्थ, अनिश्चितता, एकाकीपणा,नैराश्य ह्यात हरवत चालेले आहेत.

आम्हीच ते नशीबवान लोक आहोत ज्यांनी नात्यांची गोडी अनुभवली आहे.

आमची **पिढी** ही अशी एकमेव **पिढी** आहे जिनी नेहमी आपल्या आई **वडिलांचं** ऐकलं **आणि** आता आपल्या मुलांचंही ऐकते आहे.

लेखक - अनभिज्ञ



# शिवरायांचे आठवावे रूप

**शिवरायांचे** आठवावे रूप ।
**शिवरायांचा** आठवावा प्रताप ।
**शिवरायांचा** आठवावा साक्षेप ।
भूमंडळी ।।१।।
**शिवरायांचे** कैसें बोलणें ।
**शिवरायांचे** कैसें चालणें ।
**शिवरायांची** सलगी देणे ।
कैसी असे ।।२।।
सकल सुखांचा केला त्याग ।
म्हणोनि **साधिजे** तो योग ।
राज्यसाधनाची लगबग ।
कैसीं केली ।।३।।
याहूनी करावें **विशेष** ।
तरीच म्हणवावें पुरुष ।
या उपरीं आता **विशेष** ।
काय **लिहावे** ।।४।।
**शिवरायांसी** आठवावें ।
**जीवित** तृणवत् मानावें ।
इहलोकी परलोकीं उरावे ।
कीर्तीरूपें ।।५।।
निश्चयाचा महामेरू ।
बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारु ।
श्रीमंत योगी ।।६।। – समर्थ रामदासस्वामी



**अधिक** काळ लोटला तरी असा एकही दिवस जात नाही की, **शिवाजी** महाराजांचे नाव घेतले जात नाही. **अखिल** भारतवर्षात **शिवाजी** महाराजांच्यासारखे दुसरे व्यक्तिमत्त्व सापडत नाही. महाराजांना स्वातंत्र्याचे व **स्वाभिमानाचे** बाळकडू लहानपणापासूनच त्यांच्या मातोश्रींनी पाजलेले होते. त्यामुळे परस्थांच्या

**मगरमिठित** सापडलेला प्रदेश सोडवून त्यांनी जनतेला स्वातंत्र्यानुभव घडवून दिला.
वैभवाच्या **शिखरावर** पोचलेला आदिलशहा व सार्वभौमसत्ता पावलेला मुघल बादशहा यांचेकडे मोठे द्रव्यबल व प्रचंड सैन्यबल असतानासुध्दा महाराज त्यांना पुरून उरले. महाराजांचे ठायी निस्सीम **पितृभक्ती** होती. मुधोळच्या घोरपड्यांनी शहाजीराजांना फसवून पकडून दिले याचा सूड त्यांनी घोरपड्यांवर उगवला. **पितृप्रेमास** अनुसरूनच त्यांनी त्या वेळी उग्र स्वरूप धारण केले. स्वराज्य स्थापन करून ते **सिद्धीस** नेणे हा त्यांचा संकल्प होता. स्वराज्य रक्षणासाठी **किल्ले** बांधणे, त्यांचा उत्तम बंदोबस्त ठेवणे यासाठी द्रव्यबल लागत होते. ते **मिळवण्यासाठीच** त्यांना मोगलांच्या प्रांतात वारंवार मोहिमा काढाव्या लागल्या. त्यामुळे प्रजेला सुखी ठेवण्यासाठी ते सदैव झटले. महाराजांनी प्राप्त ऐश्वर्याचा उपभोग घेण्याचे कधीही मनात आणले नाही **किंवा सुखविषयाची** पूर्ण अनुकूलता असतानाही त्यात ते एक क्षणही गुंतून राहिले नाहीत. 'हिंदुस्थान देश यवन सत्तेतून मुक्त केल्यावाचून **विश्रांतीच** घ्यावयाची नाही' असा या महापुरुषाचा दृढसंकल्प होता. अत्यंत परिश्रमाने सतत ३० वर्षे ते युद्ध व लढाया करीत होते. त्यामुळे त्यांच्या देहास **किंवा** मनास आराम असा कधीच प्राप्त झाला नाही. राजे असूनसुद्धा त्यांचा पेहेराव नेहमी साधा असे. अलंकार धारण करणेचा त्यांना शौक नव्हता. आपल्या पदरच्या लोकांनी चांगल्या **कामगिरी** केल्या तर त्यांना **बक्षिसे** देण्याचे औदार्य त्यांच्या ठायी होते. 'स्वराज्य व स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीच आपण जन्म पावलो आहो व ते साध्य करण्यातच आपल्या ' **जीविताचे** सार्थक आहे' असे त्यांना सदैव वाटत असे. त्यामुळेच जगाच्या इतिहासात ज्यास तोड नाही अशी साहसाची कृत्ये त्यांच्या हातून घडली. आपण कोणी सामान्य मनुष्य नाही. या आर्यभूचे पांग फेडण्यासाठी आपले **जीवित** आहे, असे त्यांस वाटे व त्याप्रमाणेच महाराजांनी आपले जीवन सत्कारणी लावले.'

असे हे **धर्माभिमानी, न्यायप्रिय**, अन्य **धर्मियांचा** आदर ठेवणारे, कठोर शासक, श्रीच्या अग्रस्थानी राहून शत्रूला **भिडणारे** तसेच परस्त्री मातेसमान मानणारे असे हे इतिहासातील एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजेच छत्रपती **शिवाजी** महाराज होय ! आजही त्यांची **शिवजयंती** मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. अशा या थोर महापुरुषास मानाचा मुजरा....



अश्विनी वाघचौरे
प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी



# Unveiling the Path to Unleashing Your Best Self: The Art of Personality Development

Introduction:

In the intricate tapestry of human existence, personality stands as a defining element that shapes the essence of one's being. The journey of personality development, akin to a sculptor chiseling away at marble, involves a continuous process of self-discovery, growth, and refinement. As individuals, we possess the inherent potential to evolve and cultivate our personalities, thereby crafting a unique and impactful presence in the world.

Understanding the Essence of Personality Development:

Personality development transcends the confines of mere external transformations; it delves into the profound exploration of the self. It encompasses a holistic approach that amalgamates psychological, emotional, and behavioral elements, enabling individuals to enhance their interpersonal relationships, foster resilience, and navigate the complexities of life with grace and purpose.

Key Elements of Personality Development:

Self-Awareness: The cornerstone of personality development, self-awareness encourages individuals to delve into the depths of their emotions, thoughts, and actions. By cultivating an acute understanding of one's strengths, weaknesses, and core values, individuals can lay the groundwork for comprehensive personal growth.

Emotional Intelligence: A crucial facet of personality development, emotional intelligence empowers individuals to comprehend and manage their emotions effectively. By honing skills such as empathy, self-regulation, and social awareness, one can forge deeper connections with others and navigate challenging situations with empathy and composure.

Communication Skills: Effective communication serves as a bridge that connects individuals with the world around them. Mastering the art of verbal and non-verbal communication fosters clarity, empathy, and mutual understanding, thereby nurturing meaningful relationships and fostering a conductive environment for personal and professional growth.

Adaptability and Resilience: In the ever-evolving landscape of life, adaptability and resilience emerge as indispensable attributes for fostering personal development. By embracing change, cultivating a resilient mindset, and viewing challenges as opportunities for growth, individuals can navigate uncertainty with tenacity and grace, thereby embarking on a transformative journey of self-discovery.

Continuous Learning and Self-Improvement: The pursuit of knowledge and self-improvement serves as an instrumental catalyst for personality development. Embracing a mindset of perpetual

learning, individuals can broaden their horizons, expand their skill sets, and evolve into well-rounded personalities capable of embracing novel challenges and complexities.

### The Significance of Personality Development in Modern Society:

In the contemporary fabric of society, the significance of personality development resonates profoundly. Individuals equipped with a well-developed personality can navigate the intricacies of the professional landscape with confidence and finesse. Furthermore, a refined personality serves as a catalyst for fostering harmonious interpersonal relationships, nurturing effective leadership, and fostering a positive societal impact.

### Embracing the Journey of Self-Discovery:

Embarking on the path of personality development demands a commitment to self-exploration, self-improvement, and self-acceptance. By embracing the journey of self-discovery with an open mind and a willingness to evolve, individuals can unlock their true potential and carve a unique niche in the vast expanse of the human experience.

### Conclusion:

In the tapestry of human existence, personality development serves as a transformative thread that weaves the fabric of personal growth, resilience, and impactful contributions to the world. By fostering self-awareness, honing emotional intelligence, and embracing continuous learning, individuals can unveil the boundless potential nestled within, thereby embarking on a profound journey of self-actualization and holistic development.






**Ms. Priyanka Shejwal**
**Office Clerk**


सदर दुसरे
कविता

# दिवाळीचे वेध

दसरा, **कोजागिरीनंतर**
लागतात दिवाळीचे वेध

सणांच्या ह्या राजाकडे

जातीधर्मात नसतो भेद



इवल्या-इवल्या दिव्यांची

काय वर्णावी बात

परमार्थाने स्वत: जळतात

पण **तिमिरावर** करती मात

अंधश्रद्धा नि भ्रष्टाचार

समाजातील अंध:कार

समुपदेशनरुपी दिव्यांनी

**राष्ट्रविकासाला** लावू हातभार

ध्वनिप्रदूषण नि वायुप्रदूषण

नक्कीच सारे **मिळुनी** टाळू


गाय, पती, भाऊ नि तुळस

निरपेक्षपणाच्या निरांजनाने ओवाळ



वैष्णवी लासुरे
तृतीय वर्ष स्थापत्य
**अभियांत्रिकी**

## श्रेष्ठ व्यक्ती आणि कवी विं. दा. करंदीकर



# आयुष्याला द्यावे उत्तर...

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावुन अत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर..

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची..

असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर..

पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना,
हसू असावे ओठांवरती, काळीज काढुन देताना..

संकटासही ठणकावुन सांगावे, आता ये बेहत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर..

करुन जावे असेही काही, दुनियेतुनी या जाताना,
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा देताना..

स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर-कातर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...



# मी कुणाला कळलो नाही

मित्र कोण **आणि** शत्रू कोण
**गणित** साधे कळले नाही..

नाही भेटला कोण असा
ज्याने मला छळले नाही..

सुगंध सारा वाटीत गेलो
मी कधीच दरवळलो नाही..

ऋतू नाही असा कोणता
ज्यात मी होरपळलो नाही..

केला सामना वादळाशी
त्याच्या पासून पळालो नाही..



सामोरा गेलो संकटाना
त्यांना पाहून वळलो नाही..

पचऊन टाकले दु:ख सारे
कधीच मी हळहळलो नाही..

आले जीवनी सुख जरी
कधीच मी हुरळलो नाही..

कधी ना सोडली कास सत्याची
खोट्यात कधीच मळलो नाही...

मी कुणाला कळलोच नाही...!
मी कुणाला कळलोच नाही...!

मला भावलेली **कविता** - श्री सुरेश भट यांनी **लिहिलेली** 'मी कुणाला कळलो नाही' हि **कविता** मला अगदी माझ्या आयुष्याशी निगडीत अशीच वाटली. 'सुगंध सारा वाटीत गेलो मी कधी दरवळलोच नाही' हि ओळ अगदी समर्पक आहे त्यांच्यासाठी ज्यांनी आपले आयुष्य केवळ दुसर्यांसाठीच खर्च केले. खूपच सुंदर व मनाला भावलेली अशी **कविता**.

- सृष्टी दरंदले

द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी



- सुरेश भट

# जगता आलं पाहिजे...



मरता केव्हाही येतं,
पण जगता आलं पाहिजे..
सुख भोगता केव्हाही येत,
पण दु:ख पचवता आलं पाहिजे..
रंग सावळा म्हणून काय झालं,
कर्तृत्व उजाळता आलं पाहिजे..
रंग गोरा असला म्हणून काय झालं,
मनावरील काजळी काढता आली पाहिजे..
संशानं माणूस उंच जातो,
पाय **जमिनीवर** ठेवता आलं पाहिजे..
**मिळालेल्या** यशात समाधान मानून,
आनंदी जिवन जगता आलं पाहिजे..
पाप काय कसही करता येत,
पण पुण्य करता आलं पाहिजे..
ताठ काय कोणीही राहत,
पण जरा झुकुन वागता आल पाहिजे..
ढेच जिवनात लागतेच,
सहन करता आली पाहिजे..
**मनमपट्टी** करुन तीला,
पुन्हा चालता आल पाहिजे..
शहाण्याचं सोंग होऊन,
वेड होता आलं पाहिजे..
कशाच्या बळी न पडता,
आनंदी जगता आल पाहिजे..
जगण्याच्या लढाईत उणीव कायम भासेल,
ती उणीव भरता आली पाहिजे..
हास्य **आणि** अश्रूंचा **मिलाप** करून,
फक्त समाधानी राहता आलं पाहिजे.......
आयुष्य खूप सुंदर आहे भरभरून जगता आलं पाहिजे..

-मराठी संस्कृती



- सृष्टी दरंदले
**द्वितीय** वर्ष संगणक **अभियांत्रिकी**





# आयुष्य

श्वासापासून ते श्वासापर्यंत इतकेच का असते आयुष्य
पहिला श्वास आईच्या कुशीत **आणि** अखेरचा नसतो कोणाच्या मुठीत

नित्याची सोनेरी पहाट असतेच असे नाही
कधी उन तर कधी सावली हि दुनियेची रीतच न्यारी

कधी हसू तर कधी आसू हे तर जीवनाचे असते गमक
पण का नकोत काही क्षण असे **की** ज्यात दाखवू आपली धमक

नाती तर आहेत आयुष्याची सोबती
पण आपली असणारी अशी खूपच मोजकी

खूप काही **शिकवते** आपणाला आयुष्य
रखरखत्या उन्हातही कधी जाणवते इंद्रधनुष्य

जीवनातील चढ उतार तर वेळोवेळी बदलतात
पण तेव्हाच तर आपली माणसे कळतात

जळते तेव्हा कळते म्हणणारे सगळेच असतात
पण त्या राखेतून **उडणाऱ्यालाच** तर **फिनिक्स** असे संबोधतात

हेच तर असते आयुष्य अजून काय ते वेगळे
सर्वांनाच सर्व मनासारखे **मिळाले** तर देवपण कसे राहील निराळे



- सौ. गौरी प्रशांत बोराडे
ग्रंथपाल



## आजकालची तरुण पिढी

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी नशेमध्ये वावरणारी
गोडवा प्रेमळ नात्यांतील
अहंकाराने हरवणारी...

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी **वादविवाद** करणारी
थोरामोठ्यांचा क्षणोक्षणी
अपमान करणारी...

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी पैशाला महत्व देणारी
उतारवयात **आईवडिलांना**
आश्रमात ठेवणारी...

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी सर्व **सुखसुविधा** उपभोगणारी
तरीही काहीतरी उणीव काढून
कायम नाखुश राहणारी...

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी रोबोटिक दुनियेमध्ये राहणारी
त्यांच्या सारखीच
भावनाशून्य झालेली...

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी **क्षणिक** सुखामागे धावणारी
प्रेमात धोका **मिळाला** म्हणून
जीवन संपवणारी...

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी माणुसकीचा अर्थ **विसरलेली**
नेहमी इतरांचा
हेवाभाव करणारी....

आजकालची तरुण **पिढी**
पाहते मी चंचल मनाची
**कुविचारांनी** भरकटलेली
आ ण अस्मिता **विसरलेली**...

आजकालची तरुण **पिढी**
युवक असो वा युवती
दोघेही सारखे वागणारी
दोघेही सारखे वागणारी...



- कु. दिपाली विठ्ठल आहेर,
सहाय्यक ग्रंथपाल

## होतं का हो आयुष्यात तुमचं कधी असं ?

होतं का हो आयुष्यात तुमचं कधी असं?
वाटतं नशीब करतंय आपलंच हसं..

नव्या नव्या कपड्यालाच लागतं काळं ग्रीस,
सर्फिंग करताना तुम्हालाच पकडतो बॉस

नुकत्याच धुतल्या ओट्यावर दूध जातं उतू
क्रिकेटात तुमची ट्यूब फोडतो लेल्यांचा नातू

लवकर गेलात स्टॉपवर, की बस येते लेट
एरवी वेळेवर धावलात तरी चुकते तिची भेट

विकेंडला जोडून कामवाली मारते दांड्या
आणि नेमका जेवायला येतो सहकुटुंब बंड्या


रस्त्यावरचा मोठा खड्डा तुमच्याच वाट्याला
पंक्चरायला तुमचंच चाक पडलेल्या काट्याला



निवांत येऊन टीव्हीसमोर बसता तेव्हाच वीज जाते
देवळात चप्पल नेमकी तुमचीच चोरीला जाते

'व्हाय मी' हा प्रश्न देवाला विचारून तुम्ही थकता..
रुद्राक्ष आणि ग्रहाच्या अंगठ्या वापरता

न चुकता मग 'लकी शर्ट' आणि लकी दिवस हेरून
कामं करता



ईशा बच्छाव
तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी



## निसर्ग

निसर्गाची बघा ना काशी ही माया
आभाळ देतो जगाला छाया

आभाळात उडायला दिले पाखरू
माये ला दिले तिने लेकरू

फूल झाडे दिले तिने बागेत
मोती ओवले जसे तिने त्या जागेत

सोन्या सारखी आहे इथली माती
म्हणून माणसांना जपून ठेवली आपली नाती

वेगळीच आहे तिची **किमया**
निसर्गाची आहे सगळ्यांवर मया

कल्पनाच करू शकतो निसर्ग टिकवायचा कसं
माणसा वरच आहे की ते जगवयचा कसं




## मैत्री

मैत्री असावी माळे सारखी
जिथला एक एक मोती नीस टायला नको

मैत्री असावी चंदना सारखी
उगळता उगळ ता त्रास व्हायला नको

मैत्री असावी कापरा सारखी
पण कुणी जाळायला नको

मैत्री असावी मेना सारखी
पण ती **वितळायला** नको

मैत्री असावी गांगे सारखी
पण त्यात काही घान **मिसळायला** नको

मैत्री असावी साखरे सारखी
पण त्यात कडू पणा यायला नको

मैत्री असावी आमच्या सारखी पण ती **विळखायला** नको



प्रा. दीपाली थोरात
संगणक अभियांत्रिकी

## बापाच काळीज

मुलीची पसंती आली की
बापाच काळीज धडधडत
**चिमणी** घरट सोडणार म्हणून
आतल्या आत खूप रडतं
हसरे खेळकर बाबा एकदम
धीर गंभीर दिसु लागतात
पोरीला पाणी मागण्यापेक्षा
स्वतःच उठून घेऊ लागतात
या घरातला **चिवचिवाट** आता
कायमसाठी थांबणार असतो
म्हणून बाप लेक झोपल्यावर
तिच्याकडे पाहून रडत असतो
अंबुच्या, **लिंबूच्या** करत करत
मोठी कधी झाली कळलं नाही
बाप सांगतो तिला सोडून
मला पाणीही **गिळल** नाही
दिवसातून एकदा तरी
मायेने जवळ घ्यावं वाटतं
परक्याच धन असलं तरी
दयायला मात्र नको वाटतं
उठल्या पासून झोपे पर्यंत
बापाची काळजी घेत असते
आज ना उद्या जाणार म्हणून
मुलगी जास्तच लाडाची असते?
इकडे तिकडे जाऊन बाबा
गुपचूप डोळे पुसत असतो
लेकीचं कल्याण झाल म्हणून
पुन्हा बैठकीत हसत असतो
बी.पी. ची गोळी घेतली का?
आता कोण **विचारील** गं?
जास्त गोड खाऊ नका म्हणून
कोण कशाला दटवील गं?
मुलगी जाणार म्हणलंकी
बाप आतून तुटून जातो
कळत नाही बैठकीतून
अचानक का जातो
तिचा सगळा जीवनपट
क्षणाक्षणाला आठवत असतो
डोळयात येणाऱ्या आसवांना
बाबा वापस पाठवत असतो
बाबा कुणाचं ऐकत नाही पण
मुलीला नकार देत नाही
तिने रागात पाहिलं की मग
ताटात गुलाबजाम घेत नाही
एका अर्थानं मुलगी म्हणजे
काळजी करणारी आईच असते
पोटाचा गोळा देणाऱ्याची
कहानी फ़ार वेगळी असते
कहानी फ़ार वेगळी असते...

हि क वता माझ्या सर्व मैत्रींणीसाठी



अदिती बुवा
प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी





# मुलीच्या नजरेतला बाप

मी तुमच्या साठी एक हृदयस्पर्शी **कविता** घेऊन आली आहे.
आजची **कविता** आहे एका मुलीच्या नजरेतला बाप

तुमच्या खरबुड्या हातांना उपमा कसलीच **मिळाली** नाही
तुमच्या खरबुड्या हातांना उपमा कसलीच **मिळाली** नाही
**आणि** तुमची पडद्यामागील **भूमिका** आजपर्यंत मला कळली नाही
आज कळत तेव्हा योगायोग कसे घडायचे, आज कळत तेव्हा योगायोग कसे घडायचे.
मी **उशिरा** आली की नेमकेच तुम्ही कसे दार उघडायचे,
हे जग बघा ना, तुमचें प्रेम कसे वर वर पाहून गेले
हे जग बघा ना तुमचे प्रेम कसे पर वर पाहून गेलं.
माफ करा बाबा तुमच्यावर **लिहायचंच** राहून गेलं

बनयनाला पडलेली छिद्र साबनाने ओरबडलेली **दाढी**
बनयनाला पडलेली छिद्र **आणि** साबनाने ओरबडलेली **दाढी**
मग कळलं मला कशी आली माझ्या न शबात माडी **आणि** गाडी '
कळलच नाही दुःख **किती** स्वस्त होती?
'कळलच नाही दुःख **किती** स्वस्त होती?
घामात अश्रू लपवायची, तुमची **आईडिया** मस्त होती
परिवाराच्या समई सगट जळतांना तेलंही कस **झिरपून** गेलं
परिवाराच्या समई सगट जळतांना तेलंही कसं **झिरपून** गेल
**आणि** माफ करा बाबा तुमच्यावर **लिहायचंच** राहून गेल

बाबा तुम्ही संध्याकाळी दमून थकून यायचात
बाबा तुम्ही संध्याकाळी दमून थकून यायचात
"पण हातांचा झुला **आणि** पायांवरचा गालगुच्या कधीच चुकवला नाही
'जाऊदयाना आता सार
जाऊदयाना आता सारं
तुम्ही गेल्यावर आता हे सगळ बोलण्यात काहीच अर्थ नाही
जाऊदयाना बाबा तुम्ही गेल्यावर हे सगळ बोलण्यात काहीच अर्थ नाही
आ ण तुमच्या जबाबदाऱ्या माझा खांदा पेलवेल असा तो समर्थ आहे.

बाबा आमच्या सर्वांचे मळे फुलवीले
बाबा आम्हा सर्वांचे मळे फुलवीले,
अन तुमचं '**शिवारच** कसं करपून गेलं
माफ करा बाबा तुमच्या वर **लिहायचंच** राहून गेल
बाबा तुमच्यासारखा मौल्यवान **दागिना** हे वृध्द आश्रमात **सजविता**



बाबा तुमच्यासारखा मौल्यवान **दागिना** हे वृध्द आश्रमात **सजविता**
**आणि** सटवी ही शेवटी त्यांची होते, **आणि** ते **नशिबाला** लाजवता
सटवी वैगरे काही नाही हो, ते सगळं झूठ असत
खरचं बाबा सटवी वैगरे काही नाही हो, ते सगळं झूठ असत
सटवीचा खेळ **नशिबाला** आधार देतो
**आणि** खऱ्या अर्थाने माझ्या जगन्याला तुमचाच दिर्घा आकार देतो.

तुमच्या नसन्यानं असतीत्वं कसं होरपून गेलं
तुमच्या नसन्यान असतीत्वं कसं हारवून गेलं
माफ करा बाबा तुमच्यावर **लिहायचंच** राहून गेलं.
बाबा कोण होतात कोण तुम्ही नक्की
बाबा कोण होतात कोण तुम्ही नक्की
माझ्या **नशिबाची शिदोरी** होता, माझ्या संस्काराची तिजोरी होता.
बाबा कोण होतात कोण तुम्ही नक्की
माझ्या **नशिबाची शिदोरी** होता, माझ्या संस्काराची तिजोरी होता
जगण्याची वजाबाकी, बरोबरी तुम्ही होता
वर वर मी अंतरी तुम्ही होता
आहो! आईतर फक्त काटकसर करत होती
खरचं संवसारी मात्र तुम्ही होतात
**आणि** आयुष्यभर माझ्यासाठी तोट्यात गेला इतका मोठा व्यापारी तुम्ही होता

जगण्याची वजाबाकी, बरोबरी तुम्ही होता
वर वर मी अंतरी तुम्ही होता
बाबा तुम्ही तुम्ही होता, बाबा तुमची जागा कोणी नाही घेऊन गेले माफ करा बाबा तुमच्यावर **लिहायचंच** राहून गेलं
बाबा आता तरी सांगा ना अशी कोणती उंची गाठत होता
बाबा आता तरी सांगा ना अशी कोणती उंची गाठत होता
अन तुमच्या पुढे गाभाऱ्यातला देवही **फिका** वाटत होता
बाबा कधी वासराची गाय झाली नाही, लंगड्याचा पाय झाला नाही,
कधी दुधावरची साय झाला नाही
बाबा कधी वासराची गाय झाला नाही, लंगड्याचा पाय झाला नाही,
कधी दुधावरची साय झाला नाही
अरे या जगाला काय सांगू, तुम्ही माझ्यासाठी काय काय झाला नाहीत
तुम्ही माझ्यासाठी काय काय झाला नाही....



अदिती बुवा
प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी

## *Memories of yester years*

*In the classroom, we'd eagerly learn,*

*With teachers' guidance, it was our turn.*

*Academic challenges we'd overcome,*

*Old school wisdom made us second to none.*

*But beyond the books, we'd sprint and play,*

*In the world of sports, we'd seize the day.*

*Volleyball, Hockey with each victory won,*

*Old school sports were all about having fun.*

*Discipline was the backbone, strong and true,*

*Old school values instilled in me and you.*

*Respect and manners, the rules we'd defend,*

*Old school lessons lasting, like an eternal friend.*

*In old school days, friends were all around,*

*With laughter and mischief, the memories abound.*

*Through thick and thin, our bonds were so strong,*

*Old school days, a melody, like a heart-warming song.*

*In old school days, beneath the sun's bright rays,*

*We balanced both sports and academic ways.*

*In old school days, where memories blend,*

*With friends so true, our journey's end.*

*Now, as we look back with nostalgia's lens,*

*Old school days were our greatest treasures, my friends.*

*Though graduation comes, a new chapter to attend,*

*But the memories we've woven will never truly end..*



Kshirsagar Siddhi Jayashri Pramod
SYCO



# सदर तिसरे

# चारोळ्या

# सौंदर्य



जे शब्द तुझ्या सौंदर्याची गाथा गायचे,
जे शब्द तुझ्या स्वभावाचा गोडवा गायचे,
मी म्हणेन ते सौंदर्य तो स्वभाव खरा असेलही,
पण वापरलेले शब्द आता नक्कीच खोटे ठरलेत,
तुझ्या सौंदर्याचे चाहते असतील अनेक,
तुझ्या स्वभावाचे रंग असतीलही वेगळे,
मात्र तेच रंग पाहताना नेमका तुझा मूळ रंग कोणता,
हे ओळखताना मी चुकलो,
आजही पुसत आहे मी तुझ्या अश्रूंना
मनात रोज माझ्या सुकलेल्या हातांनी,
जे कधीही होणार नाहीत परत ओले तुझ्या त्या खऱ्या वा खोट्या आसवानी,
आता परत तीच चूक होणे शक्य नाही,
असेलही नात्याचा धागा तितकाच बळकट,
पण आता त्याच्या एका टोकाला मी **आणि** दुसऱ्या टोकाला कोणीच नाही.

-प्रा. भगवंत हांडगे
संगणक **विभाग** प्रमुख

मराठी चारोळी म्हणजे प्रेमाची वर्दी, शब्दांची गर्दी भावनांची सर्दी, कळते त्यालाच जो असतो त्यातला दर्दी. मराठी चारोळी म्हणजे शिंपल्यातील मोती , देवघरातील पोथी शेतकऱ्याच्या शेतातील काळीभोर माती मराठी चारोळी म्हणजे आकाशातील पतंग, मनातील उमंग, वा-यातील गंध, फुलातील सुगंध... मराठी चारोळी म्हणजे हवेतला गारवा, सांजवेळचा मारवा छतावरील पारवा, बालकांचा कालवा मराठी चारोळी म्हणजे facebookचा श्वास, मराठीचा ध्यास आयुष्या इतकाच खास, चारोळ्यांचा विश्वास.

## आठवणी

आठवणी जगतात **आणि** जगवतात
कधी डोळे पाणवतात तर कधी ओठांवर स्मित आणतात

आजीच्या गोष्टी, आजोबांची लाठी, ताईची वेणी
आ ण दादाची ठगीच खेचनी

गप्पागोष्टींत खळखळून हसण्याचा आनंद **आणि**
**सुट्टी** संपल्यावर गावाहून घरी येण्याचा **विरह**

कोणाच्या पडण्याने **पिकणारा** हशा तर
पडनार्याची होणारी दशा

सगळेच साठवतात ह्या आठवणी
**आणि** आपल्याला जगवतात ह्या आठवणी........



- सौ. गौरी प्रशांत बोराडे
ग्रंथपाल

# पुणे

## आम्ही पुणेकर


खेच म्हटल तर ओढतो **आणि** रच म्हटल तर
**लिहितो**

दोरी म्हटल तर बांधतो **आणि** दोर म्हटल तर
खेचतो

पहा म्हटलं तर फक्त बघतो **आणि** स्वाहा
म्हटलं तर कायमचं सोडतो

‘चहा घ्याल का?’ एवढे **विचारून** आमचे
पुणेरीपण जपतो

चार ची वामकुक्षी आमची कधी न चुकली, अशी
आमची महती सर्वदूर पसरली



**चारोळी** (चार + ओळी) म्हणजे चार ओळीची **कविता** होय. **आणि** या चारोळीच्या संग्रहाला (कडव्यांना) चारोळ्या (चार + ओळ्या) म्हटले जाते. चारोळी हा काव्य प्रकार **कवि**, लेखक **आणि** साहित्यिक **चंद्रशेखर गोखले** यांनी इ. स. 1990-91 मध्ये निर्माण केला.

### चंद्रशेखर गोखले यांच्या काही **पूर्वप्रकाशित** चारोळ्या –

एकदा मला ना
तू माझी वाट पहाताना पहायचंय
तेवढ्यासाठी आडोशाला
हळूच लपून रहायचंय

मरण दाराशी आल्यावर मी म्हटलं
तुला शंभर वर्षं आयुष्य आहे.
मरण ही चाट पडलं म्हणालं
काय हा मनुष्य आहे ?

इथे प्रत्येकजण आपआपल्या घरात,
अन प्रत्येकाचं दार बंद आहे
तरी एकोप्यावर बोलणं हा
प्रत्येकाचा छंद आहे

घराभोवती कुंपण हवं
म्हणजे आपलं जग ठरवता येतं
बाहेर बरबटलेलं असलं तरी
आपल्यापूरतं सावरता येतं


तू बुडताना मी
तुझ्याकडे धावलो ते
मदतीला नव्हे सोबतीला,
नाहीतर... मला तरी कूठे येतय पोहायला


आठवतय तुला आपलं
एका छत्रीतून जाणं
ओंघळणारे थेंब आपण
निथळताना पहाणं

माझ्या प्रत्येक क्षणात
तुझा वाटा अर्धा आहे
भूतकाळ आठवायचा तर
तुझ्याच आठवणींची स्पर्धा आहे.

आठवणींच्या देशात
मी मनाला कधी पाठवत नाही
जाताना ते खुष असतं
पण येताना त्याला येववत नाही

**कवितेच्या** वहीत **कविता** म्हणून
मी तुझं **चित्र** काढायचो
**आणि** शब्द मात्र **लिहून**
तत्परतेने खोडायचो.....




सदर
चौथे
निसर्गछायाचित्रे











**सूर्याशिवाय** प्रकाशाला **किंमत** नाही,
त्याचप्रमाणे **निसर्गाशिवाय** आपले अस्तित्व नाही



**Tanishka Ambekar**
**SYCO**






जगात तुम्ही जे इतरांना देता तेच तुम्हाला **मिळते,**
निसर्ग ही अशी व्यवस्था आहे, जी फक्त देते,
बदल्यात काहीही घेत नाही.



**Akshada Jadhav**
**SYCO**











**Ashwini Waghchaure**
**FYEE**







**Janhavi Pawar**
**SYCO**








**Nature is vast and full of beautiful things that comfort our physical and emotional senses. Natural beauty is a treasure that will never end. Nature has many faces. One of the many beautiful features of nature is the sunrise and sunset. Nature has the beauty of the refreshing sky, the snowcapped mountains and the deep green valleys. It has endless treasures of beauty in the form of various beautiful living creatures. Nature is a silent teacher. It is the most vital gift of God. It is the ultimate solution to all the needs of humans as well as other living beings. Nature plays a very important role in our life. It maintains a food chain and balance the ecosystem. It is most important and integral part of the lives of everyone. If we rightly consider every green tree is far more glorious than if it were made of gold and silver.**




**Jasmita Amin**
**FYEE**










आपल्या हृदयाची धडधड ब्रह्मांडाच्या ठोक्याशी **आणि** आपला स्वभाव निसर्गाशी जुळवून घेणे हे आपले ध्येय असले पाहिजे.

**Karan Kumawat**
**FYEE**












वाऱ्याचा सुसाट वेग, पक्ष्यांचा **किलबिलाट** समुद्राचा खळखळाट, जंगलात नाचणारे मोर,

यामध्येच सगळं काही आहे, कारण निसर्ग अनमोल आहे.


**Kshirsagar Sidhi**
**SYCO**








**Pooja Abhang**
**TYCO**















**Prajwal Khade**
**FYEE**










**Parth Shivade**
**SYCO**










Two suns in one frame.
One is the natural sun and another is the son of Jijamata....
Chatrapati Shivaji Maharaj Ki Jay!

Sakshi Bhapkar
TYEE








Pratik Arun Ambhore
FYCE









Purva Sangore
FYEE




**Prof. Bhagwant Handge**
**I/C HOD -Computer**



**Prof. Ghanshyam Borate**
**I/C HOD –Applied Science**



**Prof. Tejas Gaidhani**
**Lecturer in Electrical Engg.**



**Prof. Madhuri Kadam**
**Lecturer in Electrical Engg.**







**Ms. Priyanka Pagare**
**Office Clerk**






Shruti Pawar
FYEE



Neha Patil
SYCO



Tanmayi Kute
TYCE



Tejal Pagar
SYCO






Ms. Dipali Aher
Asst. Librarian




सदर पाचवे
रेखाटने






**Aditi Buwa**
**FYEE**







**Tanishka Ambekar**
**SYCO**















Divya Jadhav
TYEE











Deepaly Thorat
Lecturer in Computer Engineering

Om Kandekar
FYEE







*In honor of the man who painted my world with love, My Papa! A precious piece of my heart forever cherished.*




Kshirsagar Siddhi Jayashri Pramod
SYCO





Rajashri More
SYCO








सदर सहावे
पाककृती

# सखुबत्ता

प्रत्यक्षात लागणारा वेळ:

१५ **मिनिटे**

लागणारे जिन्नस:

६ मध्यम आकाराच्या **घट्ट कैऱ्या** (लोणच्याच्या **कैऱ्या**), अर्धी वाटी तिळाचं कुट, अर्धी वाटी लोनचे मसाला, अर्ध्या वाटीपेक्षा थोडा जास्त गुळ, मीठ,फोडणीसाठी २ चमचे तेल, **मोहऱ्या**, हिंग

क्रमवार पाककृती:

**कैऱ्याची** सालं काढून पातळ **काचऱ्या** कराव्यात. सोलाण्याने **काचऱ्या** केल्या तरी चालेल. तीळ भाजून त्याचे अर्धी वाटी कुट घ्यावे. कुटाइअतकाच कैरी लोणचे मसाला (बेडेकर, **प्रविण** कंवा इतर आपल्या आवडीप्रमाणे) घ्यावा. अर्ध्या वाटीपेक्षा थोडा जास्त गुळ **किसून** घ्यावा. गुळाचं प्रमाण अंदाजेचं चवीप्रमाणे ठरवा. **कैऱ्याच्या काचऱ्यांसाठी** तिळाचं कुट, लोणचे मसाला, मीठ **आणि** गुळ एकत्र करावं. त्यात हिंग- मोहरीची फोडणी थंड करून घालावी.



वाढणी/प्रमाण:

तुम्ही लोणच्याप्रमाणे खाता **कि** भाजीप्रमाणे यावर अवलंबून.

**अधिक** टिपा:

या दिवसात केला तर सखुबत्ता जास्त नाही टिकणार पण लोणच्याचा **सिझनमध्ये** (मे-जुनमध्ये) केलेला सखुबत्ता ६-७ महिने टिकू शकतो. **कदाचित** त्यापेक्षा जास्त पण टिकेल पण तेवढा ठरतच नाही. जास्त टिकण्याच्या दृष्टीने करायचा असल्यास तिळाच्या कुटाचं प्रमाण जरा कमी करावं लागेल.

माहितीचा स्रोत:

**https://www.maayboli.com/node/25081**

# मोदकाची उकड



प्रत्यक्षात लागणारा वेळ:
२० **मिनिटे**
लागणारे जिन्नस:
**सुवासिक** तांदुळ ( आंबेमोहोर **किंवा** बासमती) एक वाटी, एक छोटा चमचा प्रत्येकी तेल **आणि** तूप . **किंचितस** मीठ.
क्रमवार पाककृती:
श्रावण महीना सुरु झाला, **कि** थोड्याच दिवसात गौरी गणपतीचे वेध **लागतात** गणपतीच्या नेवैद्यासाठी सुबक, कळीदार मोदक करण्याची प्रत्येकीलाच इच्छा **आणि** हौस असते. पण मोदक चांगले होण्याच **गुपित** त्याची उकड चांगली होण्यात आहे. ती एकदा जमली की मोदक वळण काही अवघड काम नाही. मी आज उकड करण्याची एक हमखास जमणारी **रेसिपी** सांगत आहे.
तांदुळ धुवून त्यातील सर्व पाणी काढून टाकावे. मोजून दीड वाटी पाण्यात ते चार तास **भिजत** घालावेत. नंतर ते **मिक्सर** मध्ये अगदी गंधासारखे बारीक वाटावेत. वाटताना तांदुळ **भिजवलेले** पाणीच वापरावे जास्त पाणी घालू नये. पण दीड वाटी पाणी घालावेच. ( एक वाटी तांदुळाला दीड वाटी पाणी हे माप आहे उकडीचे)
ही पेस्ट एका निर्लेप पातेल्यात काढून घ्यावी. त्यात चवीपुरत मीठ, **आणि** वर **लिहीलेल** तेल **आणि** तूप घालून ते गॅस वर ठेवावे **आणि** लाकडी कालथ्याच्या मागच्या बाजूने सतत ढवळत रहावे. थोड्याच वेळात ते **घट्ट** होईल. **घट्ट** झाल की त्यावर झाकण ठेवून चांगल्या दोन तीन वाफा आणाव्यात. मोदकांसाठी लागणारी मऊ, कडा न फुटणारी, जास्त मळायची गरज नसलेली अशी उकड तयार आहे. नारळाच पुरण त्यात भरा **आणि** कळीदार मोद्रक **विनासायास** बनवा. मी केलेल्या मोदकांचा हा फोटो.
वाढणी/प्रमाण: ८-९ मोदक
**अधिक** टिपा:
सर्रास सगळीकडे बारामहीने मोद्रकाची तयार पठी चांगली **मिळत** नाही, **विशेषत**: परदेशात **आणि** लहान गावात. त्यांच्यासाठी ही पद्धत छान आहे. पाणी दिलेल्या प्रमाणा एवढेच वापरावे. जास्त अजिबात नको. काकणभर कमीच चालेल एकवेळ पण जास्त नको.

माहितीचा स्रोत:
https://www.maayboli.com/node/50159

**https://www.maayboli.com/node/54115**

# दाल - बाटी_ सोपी_ सविस्तर



प्रत्यक्षात लागणारा वेळ: ४५ **मिनिटे**

लागणारे जिन्नस:

बाटी साठी साहित्य:

- गव्हाचं पीठ (६ पोळ्यांचं)

[नेहमी घरी पोळ्यांसाठी वापरतो ते पीठ घेतलं तरी चालेल, आपल्याला सोप्या पद्धतीने जास्त ताण न घेता रेसीपी बनवावयाची आहे. त्यामुळी पीठ मुळी जाडच पाहिजे, बारिक नको, रवाच पाहिजे अशा कही अटी नाहीत. साधी , सरळ सोपी भोळी भाबडी रेसीपी आहे. ]

- मक्याचं पीठ ( एका पोळीचं) (हे ऐच्छिक आहे, नसले तरी चालते)

- जीरे ( चवीनुसार, साधारण २ लहान चमचे भरून भेसळ मुक्त जीरे )

[मी कधी कधी जीरे, मोहरी, मेथी दाणे एकत्र करून ठेवते. ते तसे येथे चालणार नव्हते, **मिश्रणातील** पदार्थ वेगळे करण्याच्या पद्धती शोधाव्या लागल्या असत्या. उपासासाठी वेगळ्या बरणीत साठवून ठेवलेले जीरे घ्यावेत, त्यात मोहरीची भेसळ नसते. ]

- ओवा ( चवीनुसार, साधारण २ लहान चमचे भरून)
- **पिवळीधम्मक** हळद (चवीनुसार, रंगानुसार)
- तेल **किंवा** तूप (शुद्ध साजूक तूप घ्यावे, उगाच कंजूसपणा करू नये)
- **पिण्यायोग्य** पाणी ( सामान्य तापमानाचे )
- खाण्याचा सोडा **चिमूटभर**

दाळ/दाल/वरण साठी साहित्य:

- तूरडाळ (घ्या तुमच्या हिशोबाने, २-३ वाट्या)
- कांदा १
- टमाटं १
- लसणाच्या सोललेल्या ६-७ पाकळ्या (देशी लसूण वापरावा **मिळाला** तर, छान स्वाद **आणि** सुगंध येतो)
- कढीपत्याची ५-६ पाने चुरडून

(ऐच्छिक आहे, उपलब्धता असेल तर ही चैन करता येते. नाहीतर **कोथिम्बीर** आहेच आपली बिचारी)

- फोडणीसाठी तेल
- मोहरी (**चिमूटभर**, भेसळ युक्त मोहरी चालेल, त्या **निमित्ताने** जीरे **आणि** मेथीदाणे पोटात जातात, पौष्टिक असतात)
- लाल तिखट पुड ( चवीनुसार, रंग जास्त **आणि** तिखटपणा कमी असणारी पुड वापरा)
- मीठ (चवीनुसार **- आयोडिन** नमक)
- धणेपुड ( चवीनुसार- **चिमूटभर**)

क्रमवार पाककृती:

ही रेसीपी अगदी घरी नेहमी उपलब्ध **असणाऱ्या** जिन्नासांचा वापर करून बनवता येते. जास्त उपद्व्याप करायला नकोत **आणि** घरच्या घरी इच्छा झाली की कमी वेळात **आणि** आहे त्या साहित्यात बनवून खाता यावी हा सरळ साधा उद्देश आहे. हे ऑथेंटिक राजस्थानी वगैरे प्रकरण नाही. मनात भाव मात्र राजस्थानी कुझीन बनवत आहोत **आणि** निगडीला जाण्यायेण्याचे पैसे, आपला नम्बर कधी येइल ह्या गोष्टीची वाट पाहण्याचे कष्ट वाचवत आहोत असेच असावेत. तरच ही **पाककृती चविष्ट** होते. नाकं मुरडून केलीत तर तो नकारात्मक भाव व बोर चव अन्नात उतरते. [ म्हणा, मी दालबाटी करून खाणारच!]

चला आता नेमकं करायचं काय ते बघुया का?

१. कुकर मध्ये एका डब्यात धुतलेली तुरडाळ, त्यात थोडसं पाणी, **किंचित** हळद, घालून ठेवावी. ही डाळ चांगली **शिजावी** म्हणून कुकरला नेहमीपेक्षा १-२ **शिट्ट्या** जास्त द्याव्यात.

येथे तुम्ही डाळ **शिजवतानाच** त्यात **टोमॅटो** घालु शकता. त्याचे चार भाग करून तेही डब्यात ढकलून द्यावे.

२. डाळ **शिजेपर्यंत** आपण बाटीसाठी **कणिक** मळून घेऊ.

बाटीसाठी लागणारे सर्व जिन्नस एका टोपात **किंवा** परातीत एकत्र **मिसळून** घ्यावे.

३. तूप गरम करून घ्यावे. हे तूपाचं (साधारण 1 छोटी वाटी) मोहन कणकेत घालून **आणि** पाणी घालून चांगले एकजीव करून मळून घ्या. **कणिक** पोळ्यांसाठी **भिजवतो** त्यापेक्षा थोडी **घट्ट भिजवायची** आहे. ( पण कणकेचा दगड नको)

४. कुकर झालय का ते पाहा. आच बंद करा.

५. बाट्या बनवण्यासाठी कणकेचा रोल बनवावा लागेल. त्यासाठी तो चपटा करून गुंडाळी करावी. ( फोटोमध्ये दाखवल्याप्रमाणे) हा रोल छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये कापून घ्यावा.

[हे स्टेप ऐच्छिक आहे. तुम्ही सरळ पीठाचे गोल गोळे बनवून त्या गोळ्यांना बाट्या असं म्हणू शकता]





६. बाट्या कुकरच्या डब्यात ठेवुन वाफवुन घ्याव्यात. [स्टीमर असेल तर तो वापरावा. नसेल तर, आधी वापरलेले कुकर थंड झाले आहे ह्याची खात्री करून डाळीचा डब्बा बाजुला काढुन (ह्या स्टेप ला लगोलग डाळ घोटुन ठेवलीत तर उत्तम!) तेच कुकर वापरावे. डब्बा दुसरा घ्यावा. मी काय केले असेल? माझ्याकडे २ कुकर आहेत मी वाफवण्यासाठी दुसरा कुकर घेतला.]

७ वाफवलेल्या बाट्या शुद्ध साजूक तुपामध्ये **किंवा** तेलामध्ये खरपूस तळून घ्याव्यात. **(क्रिस्पी/** कुरकुरीत झाल्या तरच **पाककृती** यशस्वी. )
[**तुमच्याकडे** मावे असेल तर त्यात ह्या बाट्या बेक करून घ्या.]

दाल/डाळ:

१. फोडणीसाठी तेल गरम करा. त्यात मोहरी घाला. ती तडतडली की जिरे घाला. जिरे लाल झाले की ठेचलेल्या लसणीच्या ३-४ पाकळ्या, कढीपत्याची चुरडलेली पाने घाला.

२. लसूण परतला की त्यात मघाशी **(शिजलेल्या** टमाट्यासहित) घोटुन ठेवलेली डाळ घाला. पण जरा जपुन हा, गरम तेल हातावर उडण्याची शक्यता असते, बेतानेच करावे हे काम!

३. डाळ पळीने हलवुन घ्या. **मिक्स** झाली की त्यात मीठ, तिखट, धणेपुड घालुन एकजीव होइल अस हलवुन घ्या.

४. थोडेसे **पिण्यायोग्य** पाणी घाला, २-३ लसणीच्या अख्ख्या पाकळ्या घाला **आणि** खळखळून उकळी आली की आच बंद करा.

बारिक **चिरलेला कांदा/कोथिंबीर, लिंबाची** फोड **आणि** एका वाटीत साजुक तुपाबरोबर सर्व्ह करा.

वाढणी/प्रमाण: ४ जण

**अधिक** टिपा:

१. ही साधी काढीव **पाककृती** आहे, तरीही चवीला उत्तम होते.

२. मावे मध्ये बाट्या बेक केल्या तर आणखी फास्ट होईल.

३. **चिरोट्याला** रोल करून वळकटी बनवतो तसं करुन वाफवलं तर मस्त लेअर्स पडतात.

४. इडली पात्रात सुद्धा बाट्या वाफवता येतात. प्रत्येक इडलीच्या खाचेत बाटे ठेवुन द्यायची

५. तुपात तळली तर जास्त चवदार होते. घरी कढवलेलं साजुक तुप वापरता आलं तर भारीच!

६. ह्या बाट्या नुसत्या सुद्धा छान खमंग लागतात चवीला, खाऊन बघा एखादी.

७ उरल्या तर **पाककृती** अयशस्वी असं समजु नका, एखाद्या चाळनीने झाकुन ठेवा म्हणजे वातड होणार नाहीत **आणि नंतर** खाऊन संपवा.

राजस्थानी दाल बाटी:
https://www.maayboli.com/node/51439,
मानुषी, २०१४ **(पाककृती)**

## पनीर कोफ्ता करी

**1.** साहित्य:-

1. कोफ्तासाहित्य :-

१ कप **शिजवून किसलेला** बटाट

१ टेस्पून कॉर्न फ्लोअर

१ कप २/१ ते ४/**किसलेले** पनीर

२ टेस्पून बारीक **चिरलेला** कांदा

१० ते १२ मनुके /बेदाणे

१ टेस्पून काजूचे तुकडे

१ हिरवी **मिरची**

१ टिस्पून बटर

तळण्यासाठी तेल

**मिठ**

2. करी साहित्य :-

३) कप कांदा पेस्ट ४/स्टेप १(

१) कप टॉमेटो प्युरी २/स्टेप २(

१ टेस्पून आलेलसूण पेस्ट

१टिस्पून गरम मसाला २/

१टिस्पून हळद ४/

१टिस्पून लाल तिखट २/

१ टिस्पून धणेपूड

१ टिस्पून जिरेपूड

१) कप दूध ४/होल **मिल्क**(

१ टेस्पून तेल

७पनीरचे लहान तुकडे ८-

**मिठ**

3. सजावटीसाठी:-

१ टेस्पून **कोथिंबीर**, काजू

**2.** कृती:-

कोफ्ता करी करताना आधी करी करून घ्यावी . .म्हणजे कोफ्ते नरम पडणार नाहीत

**1.** करी कृती:-

१-२ कांदे प्रेशर कूकरमध्ये २ साधारण (३ **शिट्ट्या** करून **शिजवून** घ्यावेत. **मिक्सरमध्ये** पेस्ट करून घ्यावी.

२ मोठे लालबुंद टॉमेटो २ (**शिजवून** त्याची साले काढावीत .बिया काढून टाकाव्यात ,**मिक्सरमध्ये** प्युरी करून घ्यावीत.

३ त्यात आलेलसूण पेस्ट .कढईत तेल गरम करावे ( नंतर .लाल तिखट घालावे व ढवळावे ,हळद .परतावी ५ कांद्याची पेस्ट घालून मंद आचेवर**मिनीटे** वाफ काढावी.

४ नंतर (टॉमेटो प्युरी, धणेपूड **आणि मिठ** घालून मंद आचेवर कढई झाकून वाफ काढावी शेवटी गरम . .मसाला टाकून वाफ काढावी

५ अशी ग्रेव्ही तयार करून ठेवावी (**आणि** कोफ्ते घालायच्या आधी त्यात दूध घालून मंद आचेवर ५ **मिनीटे** उकळवावे.

**2.** कोफ्ता कृती:-

१ १ एका लहान कढई मध्यम आचेवर तापवून (

टेस्पून २ त्यात.टिस्पून बटर घालावे**चिरलेला** कांदा घालून तो ब्राऊन होईपर्यंत परतावा नंतर . त्यात बारीक**चिरलेली** हिरवी **मिरची** ,काजूचे तुकडे , १ मनुके घालून**मिनीट** परतावे शेवटी पनीर .**आणि** **मिठ** घालून थोडावेळ परतावे **आणि** हे **मिश्रण** एका छोट्या भांड्यात काढावे.थोडे कोमट होवू द्यावे .
२ **(शिजवून किसलेले** बटाटे टेस्पून कॉर्न १ , फ्लोअर**आणि** थोडे **मिठ** एकत्र करून **नीट** मळून झाकून ठेवावे.
३ बटाट्याच्या **(मिश्रणाचे** साधारण १० गोळे करावे .(इंच १)

४ प्लास्टिकच्या(**पिशवीला** तेल लावून या **मिश्रणाची** पुरी लाटावी **किंवा** हातानेच मोदकासाठी करतो तशी पारी करावी त्यात आवश्यक तेवढे . पनीरचे**मिश्रण** मध्यभागी ठेवून पुरी सर्व बाजूनी बंद करावी .**आणि** हे कोफ्ते मध्यम आचेवर गोल्डन रंगावर तळून काढावे.

कोफ्ता



कोफ्ता करी



५ ग्रेव्ही मंद आचेवर गरम करावी व त्यात दूध( घालून**मिक्स** करावे ५ कढईवर झाकण ठेवून . **मिनीटे** मंद आचेवर उकळू द्यावे व त्यात वेळेवरच पनीरचे तुकडे घालावे तयार कोफ्ते सर्व्हींग प्लेटमध्ये. . ठेवावेत त्यावर गरम ग्रेव्ही घालावी **कोथिंबीर** **आणि** काजू घालून सजवावे रोटी ,नान .**किंवा** पोळीबरोबर सर्व्ह करावे.



प्रा. सोनल **रविराव** मोरे
अप्लाइड सायन्स - **केमिस्ट्री** विभाग

# पोह्याचे वडे

पोह्याचे वडे म्हणजे अगदी झटपट करता येण्यासारखे व अतिशय सोपे **आणि चविष्ट** प्रकारचे वडे आहेत. ह्या वड्यांसाठी लागणारी सामग्री सुद्धा सहज घरी उपलब्ध असते. हे वडे चहा बरोबर खायला **किंवा** जेवणाबरोबर साईड **डिश** म्हणून खायला फार कुरकुरीत व खमंग लागतात.

## 1. साहित्य

- पोहे कप २/१ -(जाड मध्यम)
- डाळीचे पीठ किंवा बेसन (दळलेलं बारीक) २ -टेबलस्पून
- ताजे खवलेले खोबरे २ -टेबलस्पून
- आलं ,तुकडा मोठा इंच १ -किसलेला
- हिरव्या मिरच्या(ठेचलेल्या) २ -
- कांदा ,कांदा २/१ -बारीक चिरलेला
- **कोथिंबीर** बारीक कप ४/१ -चिरलेली
- जिरे टीस्पून २/१ -
- मीठ स्वादानुसार -
- हळद टीस्पून ४/१ -
- तेल टेबलस्पून १ -पिठात घालण्यासाठी व , वेगळे तळण्यासाठी

## 2. कृती

1. एका चाळणीत पोहे घेऊन ते वाहत्या पाण्याने धुवून घ्या.
2. पोह्यातील सगळे पाणी निथळण्यासाठी थोड्यावेळ पोहे बाजूला ठेवा.
3. सगळे पाणी वाहून गेल्यावर भिजलेल्या पोहे एका ताटात काढून घेऊन पोह्यांत , ,आलं ,खोबरे ,बेसनमिरच्या कांदा व , **कोथिंबीर** घाला.
4. तसेच जिरे ,मीठ.व हळद ही घाला ,
5. १ टेबलस्पून गरम करून तेल ही पोह्यात घाला.
6. सगळं हाताने कालवून घ्या.
7. वरील मिश्रणाचे साधारण २ इंच मोठे भाग करून ते हातावर गोल **आणि** चपटे करून वडे थापून घ्या.
8. आता सर्व वडे गरम तेलावर सोनेरी रंगाचे दिसेपर्यंत तळून घ्या.
9. तळून झाल्यावर एका पेपरवर काढा व गरम असतानाच एखाद्या चटणीबरोबर **किंवा** केचप बरोबर खायला द्या.



प्रा. सोनल **रविराव** मोरे
अप्लाइड सायन्स - **केमिस्ट्री विभाग**

# दिवाळी शुभेच्छा !!!

शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी, आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या **संधिकालात** दिवाळीचा सण येतो. आश्विन वद्य **द्वादशी** ते कार्तिक शुद्ध **द्वितीय** या दरम्यान दीपोत्सव साजरा केला जातो. सहा महिन्यांची प्रदीर्घ रात्र संपून सहा महिन्यांचा दिवस सुरु होताच त्या प्रदेशातील लोकांना नवजीवन प्राप्त झाल्यासारखे वाटत असावे **आणि** त्यासाठीच ते हा आनंदोत्सव करीत असावेत, असे म्हटले जाते. चौदा वर्षांचा वनवास संपवून रामचंद्र सीतेसह अयोध्येला परत आले, तो याच दिवसात. प्राचीन काळी हा यक्षांचा उत्सव मानला जायचा. अंधार दूर करून प्रकाशाचे अस्तित्व निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतीक मानला जातो. दिव्यांच्या प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधकार दूर व्हावा म्हणून हा दीपोत्सव साजरा केला जातो, अशी मान्यता आहे.

या दिवाळीनिमीत्त आपल्या नातेवाईकांना, **मित्र** मैत्रींणीना शुभेच्छा देण्यासाठी हा खास

ई-दिवाळी अंक ***“संचितकल्प”***

"रांगोळीच्या सप्तरंगात सुखाचे दिप उजळू दे,

लक्ष्मीच्या पावलांनी घर सुख समृध्दीने भरू दे.

धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी,

धैर्यलक्ष्मी,शौर्यलक्ष्मी, वद्यालक्ष्मी,

कार्यलक्ष्मी, **विजयालक्ष्मी**, राजलक्ष्मी..!

या दिपावलीत या अष्टलक्ष्मी तुमच्यावर धनाचा वर्षाव करोत...
दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा..."

**-प्रियंका वाणी, डिजिटल कंटेंट प्रोड्यूसर**

## दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

"स्नेहाचा सुगंध दरवळला,
आनंदाचा सण आला.
**विनंती** आमची परमेश्वराला,
सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला.
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!"

"सगळा आनंद सगळे सौख्य,
सगळ्या स्वप्नांची पूर्णता,
यशाची सगळी **शिखरे**,
सगळे ऐश्वर्य,
हे आपल्याला **मिळू** दे,
ही दीपावली आपल्या आयुष्याला एक नवा उजाळा देवू दे..."

"लक्ष लक्ष दिव्यांनी उजळुन निघो ही निशा
घेऊनि येवो नवी उमेद नवी आशा,
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!"






गोखले एज्युकेशन सोसायटीचे सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतच्या प्राचार्या डॉ. सौ. श्रद्धा देशपांडे यांच्या सहकार्याने

"सोचितकल्प"

हा प्रथम ई-दिवाळी २०२२-२३ अंक **प्रकाशित** करण्यात येत आहे.



**"संचितकल्प"** - ई दिवाळी अंक हि संकल्पना, आराखडा, मांडणी

**-** सौ. गौरी बोराडे **,** ग्रंथपाल



मोलाचे सहकार्य, शब्दरचना व योगदान

कु. दिपाली आहेर, सहाय्यक ग्रंथपाल

# ॥ ज्ञानदीप लावू जगी ॥

Gokhale Education Society's

# SIR DR. M. S. GOSAVI POLYTECHNIC INSTITUTE,

Nashik Road, Nashik- 422 101

